बुधवार, १० जानेवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी  दैनिक

वर्ष - ०३  अंक - १४६

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 10 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-146 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


## महत्त्वाची बातमी

## प्रख्यात संगीतकार उस्ताद राशिद खान यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रख्यात संगीतकार उस्ताद राशिद खान यांचे मंगळवारी निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. मिळालेल्या माहितीनुसार, राशिद खान यांना प्रोस्टेट कॅन्सरचे निदान झाले होते. त्यांच्यावर कोलकात्यातील एका रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांना व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले होते. मात्र, डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही त्यांना वाचवण्यात यश आले नाही.
अखेर आज मंगळवारी ३ वाजून ४५ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचं पार्थिव कोलकात्यातील पियरलेस रुग्णालयात ६ वाजेपर्यंत ठेवण्यात येणार आहेत. त्यानंतर आज रात्रभर कोलकातातील पीस हेवन रुग्णालयात त्यांचं पार्थिव ठेवण्यात येणार आहे. १० जानेवारी रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. उस्ताद राशिद खान यांना २०२२ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले होतं. त्यांच्या निधनाच्या बातमीनंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शोक व्यक्त केला आहे. उस्ताद राशिद खान यांचे जाणे संपूर्ण देशासाठी आणि संगीत क्षेत्राचे मोठे नुकसान आहे. त्यांच्या जाण्याचे अतिशश दुःख असून अजूनही ते आता आपल्यात नाहीत यावर विश्वास बसत नाही, अशा शब्दात ममता बॅनर्जी यांनी शोक व्यक्त केला आहे.
मागील महिन्यात सेरेब्रल अटॅक आल्यानंतर उस्ताद राशिद खान यांची तब्येत अधिकच बिघडली होती.
त्यांच्यावर सुरुवातीला टाटा मेमोरियल कॅन्सर रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना कोलकात्यातील एका रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले.

# राहुल नार्वेकरांनी प्रतिमा जपली पाहिजे

## शरद पवार : बिल्किस बानो प्रकरणी सर्वसामान्यांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : ज्यांच्यापुढे केस आहे आणि ज्यांची केस आहे. ते जाऊन भेटतात इथेच संशय निर्माण होतो आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी आपली प्रतिमा जपली पाहिजे. बिल्किस बानोच्या आरोपींना माफ करण्याचा निर्णय गुजरात सरकारचा होता. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. या निकालाचे मी स्वागत करतो, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी मुंबईतील प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.**



शरद पवार म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या निकालात हा अधिकार महाराष्ट्र सरकारचा असल्याचे म्हटले आहे. म्हणजेच गुजरात सरकारने महाराष्ट्र सरकारच्या अधिकारावर अतिक्रमण केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे आणि याप्रकरणी राजकीय हस्तक्षेप करू न देण्याची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन शरद पवार यांनी केले आहे. शरद पवार पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना यांची बैठक होणार आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकत्रित काम कसे करावे यासंबंधीची चर्चा होणार आहे. राष्ट्रवादीच्या वतीने राष्ट्रीय महासचिव जितेंद्र आव्हाड हे उपस्थित राहणारे असून त्यासाठी मी आव्हाड्यांना सल्ला दिला आहे की त्यांनी पक्षाच्या हिताची भूमिका मांडावी.
इंडिया आघाडीमधील सर्व घटक पक्ष यांनी एकत्रित आगामी निवडणुकांना सामोरे जावे. यासाठी ही प्राथमिक बैठक असेल यापुढे आणखीनही बैठका होतील. त्यानुसार निर्णय घेण्यासाठी सर्व पक्षातील ज्येष्ठ नेते देखील आगामी बैठकांना उपस्थित राहतील. तर सध्या इंडिया आघाडीमध्ये सर्व पक्षांची एकमेकांशी सुसंगत अशी भूमिका घेण्याची तयारी असल्याचे देखील शरद पवार साहेबांनी सांगितले. शरद पवार म्हणाले की, सध्या जागा कोणा कडे आहे? ती जागा कोणी लढवली तर कुणाला जास्त मत मिळाली या आधारावर जागा वाटप करताना विचार करावा. तसेच जास्त जागा मिळव्यात ही प्रत्येकाची अपेक्षा असते. पण चर्चेतून मार्ग निघेल. काँग्रेसकडे जास्त जागा आहेत. काँग्रेस जास्त जागा जिंकण्याची क्षमता ठेवते. त्यामुळे महाराष्ट्रात ८ ते ९ जागावर लढण्याची चर्चा होऊ शकते. त्याचबरोबर इंडिया आघाडीमध्ये वंचित घेण्याबाबत शरद पवार म्हणाले की, वंचितला सोबत घ्यावे अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. शरद पवार साहेब म्हणाले की, देशातील केंद्र सरकार बदलत नाही, तोवर असे धाडी होत राहणार. विरोधी पक्षातील नेत्यांवर कारवाई होतच राहणार आहे. आमदार रोहित पवार, आमदार रवींद्र वायकर यांच्या संदर्भातून देखील असेच होत आहे. यापूर्वी देखील महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांविरोधात अशाच प्रकारे कारवाई करण्यात आली आहे. सरळ असे दिसते की, सत्ताधारी पक्षावर कारवाई होत नाही, असे शरद पवार साहेब म्हणाले.शरद पवार म्हणाले की, आम्ही काँग्रेसच्या जयराम रमेश यांच्यासह निवडणूक आयोगाकडे आमच्या बॅलेट पेपरवर प्रश्नांना उत्तरे देण्याची मागणी केली होती. परंतु आयोगाने आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. आयोगाने १० ते १५ पानांचे पत्र जयराम रमेशांना पाठवले. त्याचा सार असा आहे की, काहीही बदल करण्याची आवश्यकता नाही जे आहे ते उत्तम आहे निवडणूक आयोगाने उत्तर दिले होते असेही शरद पवार म्हटले.
शरद पवार म्हणाले की, अजित पवार आणि त्यांच्यासोबत गेलेले नेते केंद्रीय तपास यंत्रणांच्या दबावामुळे बाहेर गेले आहेत. अजित पवार आणि त्यांना अशी भूमिका घ्यायला लावणाऱ्यांना पुन्हा पक्षात येऊ दिले जाणार नाही. याबाबत माझी भूमिका मी स्पष्ट केली आहे.

# सुनील केदार यांच्या शिक्षेला स्थगिती

## पाच वर्षांची सुनावली होती शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज





**नागपूर :** माजी मंत्री सुनील केदार यांच्या शिक्षेला स्थगिती देत नागपूर उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक प्रकरणात ट्रायल कोर्टने केदार यांना पाच वर्षांची शिक्षा सुनावली होती. सर्व बाबींचा विचार करून सुनील केदार यांना जामीन मंजूर केला जात आहे, असा आदेश न्यायमूर्ती उर्मिला जोशी फाळके यांच्या खंडपीठाने दिला. सुनील केदार यांना एक लाख रुपये मोबदल्यात जामीन मंजूर केला आहे. सुनील केदार यांना प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला न्यायालयात हजर व्हायचे आहे.
नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १५० कोटी रुपयांच्या सरकारी रोखे खरेदी घोटाळा प्रकरणात राज्याचे माजी मंत्री सुनील केदार यांच्यासह सहा आरोपींना कमाल पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच प्रत्येकी एकूण १२ लाख ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला होता. २००१-२००२ मध्ये होम ट्रेड लिमिटेड मुंबई, इंद्रमणी मर्चट्स प्रा. लि. कोलकाता, सेंच्युरी डीलर्स प्रा. लि. कोलकाता, सिंडिकेट मॅनेजमेंट सर्व्हिसेस अहमदाबाद व गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हिसेस मुंबई यांच्याकडून बँकेच्या रकमेतून १२५ कोटी रुपयांचे सरकारी रोखे खरेदी करण्यात आले होते. त्यानंतर या कंपन्यांनी सरकारी रोखे दिले नाही व बँकेची रक्कमही परत केली नाही. ही रक्कम व्याजासह १५० कोटी रुपयांवर गेली आहे. १९९९ साली सुनील केदार हे नागपूर जिल्हा बँकचे अध्यक्ष झाले. बँकेच्या रकमेतून २००१-०२मध्ये होम ट्रेड लिमिटेड मुंबई, इंद्रमणी मर्चंट्स .लि. आणि अन्य काही कंपन्यांकडून सरकारी प्रतिभूती खरेदी करण्यात आल्या होत्या. सहकार विभागाचा कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करत ही रक्कम गुंतवण्यात आली होती. पुढे खाजगी कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने बँकेतील शेतकऱ्यांचे पैसेही बुडाले होते.

# आरक्षणाच्या विरोधात बोलले तर वेगळा विषय हाती घ्यावा लागेल

## मनोज जरांगे यांचा अजित पवारांना इशारा

आधुनिक केसरी न्यूज




**जालना :** अजित पवार यापुढे मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलले तर त्यांचा वेगळा विषय हाती घ्यावा लागेल. तुम्ही तुमच्या ज्ञानाचा ग्रंथ लिहा पण मराठा आरक्षणाबाबत बोलायचे नाही, असा इशारा जरांगे पाटलांनी अजित पवारांना दिला आहे. गोदाकाठच्या १२३ गावांच्या संवाद दौऱ्याचा पहिला टप्पा आटोपून जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे पोहचले. त्यानंतर ते मंगळवारी पत्रकारांशी बोलत होते.
पहिल्यापेक्षा या दौऱ्यात लोकांचा पाठिंबा वाढला आहे. जास्त दिवस झाल्यानंतर आंदोलनाची धार कमी होते पण या दौऱ्यात लोकांचा पाठिंबा वाढलेला दिसून आला, असं जरांगे पाटील म्हणाले आहेत. मोर्चात आमच्या वाढलेल्या संख्येमुळे सर्वांना आरक्षण मिळणार आहे. अंतरवालीपासून मोर्चात मराठा बांधवांची संख्या कमी असेल. पण पुण्यापासून वाढेल. प्रशासन मोर्चात सहभागी होणाऱ्या लोकांचा आकडा काढत आहे. पण त्यांचाही आकडा चुकेल, असा दावाही त्यांनी केला. आमच्या मुंबई मोर्चात ओबीसी समाज नाही तर ओबीसी नेते आडवे येत आहे. ही त्यांची जुनीच सवय असल्याचा टोला जरांगे यांनी ओबीसी नेत्यांना हाणला आहे. राज्य मागासवर्ग आयोगाला सूचना करण्याइतपत आपण मोठे नाही. पण त्यांच्या कामांची माहिती आम्ही घेत आहोत. त्यांनी सर्वेक्षणासाठी जे प्रश्न निवडले आहेत, ते सर्व समाजासाठी असायला हवेत, अशी मागणीही जरांगे यांनी केली आहे. ब्राम्हण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी फडणवीस यांना पत्र देणार असल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे.

# तर हे ४० गद्दार अपात्र झाले पाहिजेत : आदित्य ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज



मुंबई : शिवसेना आमदार अपात्रता सुनावणीचा अंतिम निकाल बुधवारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर देणार आहेत. या निकालाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. शिवसेनेतील शिंदे गट व ठाकरे गट एकमेकांसमोर पुन्हा एकदा उभे ठाकले असून टीका-टिप्पणी होत असल्याचे दिसत आहे. जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड़ या उक्तीचा उल्लेख करत आदित्य ठाकरेंनी राहुल नार्वेकरांवर टीका केली. दीड वर्षं त्यांनी एवढे खेचल्यानंतर न्याय काय मिळणार? एक तर संविधानानुसार निर्णय दिला तर हे ४० गद्दार अपात्र झाले पाहिजेत. पण जे संविधान भाजपाला लिहायचे, आंबेडकरांचे संविधान बदलायचे, त्यानुसार निर्णय दिला तर आम्ही अपात्र होऊ, असे आदित्य ठाकरे म्हणाले.
एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मेरिटवर आधारित निकाल लागेल, अशी सूचक टिप्पणी केली असताना दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी निकालाआधीच लवाद एकनाथ शिंदेंना भेटतात म्हटल्यावर निकाल काय लागणार, अशा प्रकारची टिप्पणी केली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी याबाबत सूचक प्रतिक्रिया दिली आहे. आदित्य ठाकरेंनी माध्यमांशी बोलताना राहुल नार्वेकरांच्या निकालाबाबत भूमिका मांडली आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या भेटीचा उल्लेख केला. अध्यक्ष स्वतः मुख्यमंत्र्यांच्या भेटीला जातात. न्यायमूर्ती स्वतः आरोपीला भेटायला जात आहेत, असे मी कधीच ऐकले नव्हते. तुम्ही लवाद म्हणून काम करत असताना असं करू शकत नाही, असे आदित्य ठाकरे म्हणाले. हे फक्त शिवसेनेबद्दल नाही. जग बघते. भारतात लोकशाही टिकणार की नाही? यासाठी सगळ्या जगाचे लक्ष महाराष्ट्रावर आहे. हे स्वतःचे नाव खराब करणार नाहीत, अशी अपेक्षा आहे, अशी अपेक्षाही आदित्य ठाकरेंनी व्यक्त केली आहे. तसेच, हे सरकार टिकले, तर मंत्रालयही सूरत किंवा अहमदाबादला हलवतील, अशी खोचक टिप्पणीही त्यांनी यावेळी केली. दरम्यान, ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांच्यावर आज सकाळी ईडीने छापा टाकला. त्यावरून आदित्य ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांना टोला लगावला. आता कुणालाही कुणाची भीती वाटत नाही. ईडी, सीबीआय, आयटी हे एनडीएचे घटक झाले आहेत. सत्तेच्या विरोधात लढणाऱ्यांवर हे घटक दबाव आणत राहतात, असे आदित्य ठाकरे म्हणाले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## ते चाळीस दिवस...

आधुनिक केसरी

१ मे २०२३ चा दिवस. आपण सगळे महाराष्ट्रातील लोक महाराष्ट्र दिन साजरा करत असताना कोलंबिया देशातील अमेझॉनच्या जंगलात एक महाभयंकर घटना घडत होती. कधी कधी सत्य हे कल्पनेपेक्षाही भयंकर आणि अद्भुत असतं . एखाद्या चित्रपटाचा विषय व्हावा अशी ही हकीगत. कोलंबिया देशातील सेस्ना २०६ हे छोटंसं खाजगी विमान एका छोट्या गावातील काही लोकांना घेऊन सॅन जोस डेल ग्वावियारे या शहराकडे निघालं होतं. या विमानात त्या विमानाच्या वैमानिकासह एकूण सात जण प्रवास करत होते. एक स्थानिक नेता होता. एक आई तिच्या चार लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी निघाली होती. अमेझॉनच्या जंगलातील हितोतो या आदिवासी जमातीतील हे सगळे रहिवासी होते. तेथील सशस्त्र टोळ्यांच्या दहशतीपासून सुटका करून घेण्यासाठी त्यांना आपलं गाव सोडणं भाग पडलं होतं. पण हायरे दैवा ! सुरक्षिततेच्या शोधात जाणाऱ्या या निष्पाप जीवांचं विमानच असुरक्षित झालं. विमानानं साधारणपणे ३५० किमी चा पल्ला पार केला असेल नसेल तोच विमानाच्या इंजिनात काहीतरी बिघाड आहे याची वैमानिकाला जाणीव झाली. आता आपल्या सगळ्यांच्या जीवाला धोका आहे हे त्यानं विमानातील सगळ्यांना सांगून टाकलं. थोड्याच वेळात त्या विमानाचा रेडिओ संपर्क तुटला. पुढच्या काही क्षणातच भयानक आवाज करीत ते विमान अमेझॉनच्या घनदाट जंगलात कोसळलं. हे विमान एका झाडावर कोसळलं आणि झाडावरच अडकून पडलं. या दुर्दैवी अपघातात वैमानिक आणि त्या विमानात असलेला स्थानिक नेता मृत्युमुखी पडले. आपल्या आईसोबत प्रवास करीत असलेल्या त्या छोट्या चार मुलांची जीवनरेखा मात्र बळकट होती. या भयानक अपघातातून ते छोटे जीव आश्चर्यकारकरित्या बचावले. त्या मुलांना सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी निघालेली ती माता मात्र गंभीर जखमी झाली होती. तिची वाचण्याची कोणतीही शक्यता दिसत नव्हती. पण अशाही परिस्थितीत या मातेने चार दिवस मृत्यूशी झुंज दिली. पण कोणतीही मदत वा वैद्यकीय




उपचार मिळू न शकल्याने तिने या जगाचा निरोप घेतला. तिचा जीव अडकला होता तिच्या पिलांमध्ये. जाता जाता त्यांना कसं जगायचं हे ती सांगून गेली. मला इथेच सोडून द्या आणि तुम्ही सुरक्षित जागी पोहचण्याचा प्रयत्न करा. स्वतःचा जीव वाचवा.



## आनंदी पहाट

## सहजीवनात तुझे-माझे करणे तापदायक

आधुनिक केसरी

अलीकडच्या काळांत पती-पत्नीच्या मतभेदाला, वादाला पत्नीच्या जवळच्या नातलगांना जबाबदार धरले जात असल्याचे दिसून येते. काही प्रमाणांत त्यांचा सहभाग गरजेपेक्षा, जरुरीपेक्षा अधिक असल्याचे देखील चित्र दिसून येते. ह्यांतही आर्थिक बाब प्रकर्षाने वादाचे निमित्त असल्याचे कळते. काहीवेळा मानसिक पातळींवर होणारे परिणाम इतके गंभीर असतात, कि संबंधित व्यक्ती जीव देण्या-घेण्याची कृती करण्यास प्रवृत्त होते, ते थांबलेच पाहिजे. अनेकदा स्वभावापेक्षा प्रभावाला महत्व अधिक दिले जाते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कालांतराने परस्परांमधील आभावांची जाणीव व्हायला लागते, दुरावा निर्माण होऊ लागतो. संवादाआभावी निर्माण होणाऱ्या गैरसमजुतीचे वादांत रुपांतर होऊ लागते. रोजच्या कामांतून थोडा वेळ काढून आपले रुटीन, काम आणि मुले असे मुद्दे वगळून एकमेकांशी संवाद साधला तर हे नाजूक संबंध मजबूत व्हायला मदत होऊ शकते. ह्यासाठी स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा असतो, हे समजून घेतले पाहिजे. कौटुंबिक कलहांची सुरुवात आर्थिक कारणांमुळे होत असल्याचे अनेकदा समजते. विवाहानंतर उभयतांनी मिळवलेले आपापले उत्पन्न हे स्वतःसाठीसुद्धा न वापरता जोडीदाराने मिळवलेल्या पैशावर हक्क दाखवायचा, त्यांतूनच खर्च करायचा आणि स्वकमाईतून मिळालेला पैसा शिल्लक ठेवायचा. ह्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी केवळ पैशाचीच गरज भासू लागते. स्वअर्थ नाही तर परम अर्थ हीच भावना रुजणे तापदायक, घातक ठरू शकते, ही जाणीव होणे आवश्यक असते. आर्थिक पातळीवर माझे ते माझेच आहे, पण तुझे सुद्धा माझेच आहे, असा विचार करणारी व्यक्ती मानसिक पातळीवर मात्र तुझे-माझे करून मोकळे होताना दिसते. एकाच कुटुंबात राहून देखील प्रत्येकाचा आर्थिक ताळेबंद मात्र स्वतंत्र तयार होतो. त्या ताळेबंदला कोणतेही ताळतंत्र नसते, तो ज्याच्या त्याच्या टाळेबंद कपाटात सुरक्षित ठेवलेला असतो.



आधुनिक केसरी

## स्थितप्रज्ञ व्हावा | अनुभव ||

करूनी प्रपंच | सात्विक वृत्तीने ||
साधावा नित्त्याने | परमार्थ ||१||
सकलांचे हीत | चिंती क्षणोक्षणी ||
संत चिंतामणी | तेच जाण ||२||
सज्जनांचे ढोंग | घेऊनी जगती ||
त्यांची खलवृत्ती | विनाशक ||३||
आप पर भाव | जळोनिया जावा ||
बालक मी व्हावा | दारी तुझ्या ||४||
संसार परमार्थ | करूनी सांगावा ||
स्थितप्रज्ञ व्हावा | अनुभव ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

मागील दुःख आठवलें । जें जें होतें प्राप्त जालें ।
मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ॥५१॥
आरुण्यरुदन करितां । कोणी नाहीं बुझाविता ।
मग होये विचारिता । आअपुले मनीं ॥५२॥
आतां कासया रडावें । प्राप्त होतें तें भोगावें ।
ऐसे बोलोनिया जीवें । धारिष्ट केलें ॥५३॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

सद्गुरु के उपदेश में,
बहुधा होत उपाधि ।
गुरुवा गुरु बिचलावहीं, निन्दि कुतर्कन
बाधि ।।११३।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/११३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरु-शरणागत होऊन उपदेश ग्रहण करण्यात बऱ्याचदा अनेक विघ्ने आणि अडथळे निर्माण होतात. गुरुवा आणि गुरू लोक, जे सद्गुरु देवांच्या ब्रह्मविद्या विहंगम योग सिद्धांतापासून अनभिज्ञ आहेत, ते स्वार्थवश अनेक प्रकारच्या निंदा आणि कुतर्कांच्या द्वारे मुमुक्षु जिज्ञासूंना उपदेश ग्रहण करण्यापासून विचलीत करतात, बहकवतात. म्हणून त्यांचं न ऐकता दृढ विश्वास पूर्वक सद्गुरु शरणागत होऊन ब्रह्मविद्या विहंगम योगाचा उपदेश ग्रहण करणे, हा उत्तम विवेक आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हज्ञान

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

प्रRा, पश्चंती,मध्यमा आणि वैखरी या चारही वाणी स्वस्वरूपाशी तुलना केली तर कमी पडतात. त्या शुन्य होतात. म्हणून तेथे शब्द चातुर्याचे काम चालतं नाही. शब्दांची कला याठिकाणी उपयोगी पडत नाही. आपण नेहमीच म्हणतो शब्द हे हवेचे बुडबुडे आहेत. कारण शब्द उच्चारला की तो लगेच नाश ही पावतो. म्हणून शब्द अशाश्वत असतो. शब्दांचे अशाश्वत पण आपण प्रत्यक्ष पहातो. त्यासाठी वेगळे पुरावे देण्याची गरज रहात नाही.
अनेक प्रकांड पंडित व त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण केलेले वाद कालांतराने गळून पडतात. प्रत्यक्ष शब्द नाशवंत आहेत.
सर्वब्रम्हवाद आणि विमल ब्रम्हवाद असे पक्ष स्वस्वरूपामध्ये शिल्लक रहात नाहीत.

## नाम-रूपाचा संबंध !

आधुनिक केसरी

नाम घेत असताना रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. पण नाम हे रूपाच्या आधीही असते आणि नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. राम जन्माला येण्यापूर्वी वाल्मीकींनी रामायण लिहिले, आणि रामाने मागाहून जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते, आणि रूप गेल्यानंतर आजही नाम शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते; म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य आहे ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. तेव्हा नाम घेणे ही गोष्ट मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचेही ध्यान राहिले तर उत्तमच; पण ते तसे न राहिले, तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा गडी आहे. तो गृहस्थ ' राम राम ' असा



जप करीत बसला आहे, पण त्याचे लक्ष राम-रूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत. अशा वेळी त्याला जर एकदम विचारले की, ' तुम्ही कुणाचे नाव घेत आहात ? ' तर अर्थात् 'रामाचे', असेच उत्तर तो देईल. हे उत्तर देताना त्याच्या मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की, नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच, रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये. नामस्मरण करण्याचा अट्टाहास ठेवावा, त्यात सर्व काही येते. एखाद्या माणसाची आणि आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते आणि नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल, आणि आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे फक्त नाव येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही, म्हणून त्याचे रूप माहिती नाही; परंतु आपल्याला त्याचे नाम घेता येईल. सध्यासुद्धा, त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चीत कुठे आहे ? एक राम ' काळा ' तर एक राम ' गोरा ' असतो; एक राम 'लहान' तर एक ' मोठा ' असतो; पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वतः अरूप आहे; म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ आहे. हे त्याचे नाम तुम्ही आवडीने, अखंड घ्या आणि आनंदात रहा.

**६. दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, आणि साधनात साधन नामस्मरण.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

उभयता संतती नसल्याने नेहमी रंजीस असत व त्यांस कोणत्याच गोष्टीची हौस वाटत नसे. ते दोघे ह्या मुलाचा प्रतिपाळ आस्थेने करतील असे जाणून त्यांच्याबद्दल सर्वांनी मनापासून मच्छिंद्राकडे शिफारस केली. मग अशा लोकप्रिय स्त्रीपुरुषांच्या हातात गहिनीनाथांसारखे रत्न देणे नाथासहि प्रशस्त वाटले. त्याने मुलास गंगाबाईच्या ओटीत घातले आणि सांगितले की, मातोश्री ! हा पुत्र वरदायक आहे. करभंजन म्हणून जो नवनारायणांपैकी एक त्याचाच हा अवतार आहे. ह्याचे उत्तम रितीने संगोपन कर, तेणेकरून तुझे कल्याण होईल व जगाने नावाजण्यासारखा हा निपजेल;

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १० जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari


# ‘चांदा ॲग्रो’च्या माध्यमातून उघडले कृषी विकासाचे नवे दालन

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची संकल्पना आणि प्रशासनाचे सुक्ष्म नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शेतकरी समृध्द आणि आत्मनिर्भर झाला तरच देश प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर होईल, ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात दि.3 ते 7 जानेवारी दरम्यान चांदा ॲग्रो – 2024 चे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले. पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे जिल्ह्यात प्रथमच या माध्यमातून कृषी विकासाचे नवे दालन शेतक-यांना उपलब्ध झाले. विशेष म्हणजे जिल्हा प्रशासनाचे सुक्ष्म नियोजन, खिचडीचा विश्वविक्रम आणि शेतक-यांना 13 लाखांचे आकर्षक बक्षीस वाटपाचे पाच दिवसीय कृषी महोत्सवाचा रविवारी समारोप करण्यात आला. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थान यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने चांदा क्लब ग्राऊंडवर जिल्हा कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला होता. दि. 3 जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून या कृषी महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. पाच दिवसीय या कृषी महोत्सवात दररोज किमान 12 ते 14 हजार याप्रमाणे अंदाजे 60 हजार नागरिकांनी उपस्थिती दर्शविली, तर 25 हजार जणांनी यात नोंदणी केली.



7000 किलो पेक्षा अधिक खिचडीचा विश्वविक्रम : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी चंद्रपूर येथील कृषी महोत्सवात 7 हजार किलोपेक्षा जास्त तृणधान्यांची खिचडी बनवून विश्वविक्रम नोंदविला. ही खिचडी शाळांमध्ये तसेच शहरातील वस्त्यांमध्ये वाटण्याची व्यवस्था केली. तसेच कृषी प्रदर्शनाच्यास्थळी विविध स्टॉलवर असलेल्या प्रत्येक माणसाला आणि शहरातील 35 हजार लोकांपर्यंत ही खिचडी पोहोचेल, अशी व्यवस्था जिल्हा प्रशासनाने केली.

बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते अभियानाचा शुभारंभः जिल्हा कृषी महोत्सवात ‘बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते’ अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यात 5001 कि.मी. चे शेतपाणंद रस्ते तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये मातीकाम पूर्ण झालेले 2055 कि.मी. चे रस्ते, मातीकाम सुरू असलेले 405 कि.मी. चे रस्ते आणि नव्याने प्रस्तावित 3182 कि.मी.चे मुरमीकरणाचे शेतपाणंद रस्ते आणि मुरमीकरण झालेले परंतु खडीकरण बाकी असलेले इतर रस्ते सुरू करण्यात येतील.

मिशन जयकिसान अभियानाचा शुभारंभ : कृषी क्षेत्रात चंद्रपूर जिल्हा एक मॉडेल बनावा, या भागातील शेतकरी संपन्न व्हावा, शेतीसह कृषीपूरक उद्योगाला जिल्ह्यात चालना मिळावी आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागात कृषीवैशिट्य असलेली गावे विकसित व्हावी, या पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अभिनव संकल्पनेतून ‘ मिशन जय किसान’ अभियानाचा कृषी महोत्सवात शुभारंभ करण्यात आला.

ऐकार्जुना (ता. वरोरा) येथे 25 हेक्टर जमिनीवर 31 कोटी 90 लक्ष रुपये खर्च करून भाजीपाला संशोधन केंद्र उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन कार्यक्रमात संशोधन केंद्राला मान्यता देण्यात आल्याचा आदेश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सुपूर्द केला.

पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीः पाच दिवस चाललेल्या कृषी महोत्सवात कृषी विषयक विविध चर्चासत्रे, परिसंवाद यांच्यासोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत आणली. सोबतच या कृषी महोत्सवात जवळपास विविध विभागाने 350 स्टॉल लावले होते.

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून 13 लाखांचे आकर्षक बक्षीस वाटप : जिल्हा कृषी महोत्सवात नोंदणी केलेल्या शेतक–यांसाठी लकी ड्रॉ च्या माध्यमातून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून व्यक्तिशः 13 लाखांचे आकर्षक बक्षिसांचे वाटप करण्यात आले. यात प्रथम क्रमांकाचे मिनी ट्रॅक्टर विजेता कोरपना तालुक्यातील वडगाव खिराडी येथील पंढरी गोंडे तर द्वितीय क्रमांकाची बुलेट विजेता उर्जानगर येथील विशाल बारेकर ठरले. याव्यतिरिक्त तिस–या क्रमांकाचे पॉवर टिलर शेणगाव (ता. जिवती) येथील तुकाराम कपडे यांना, चवथ्या क्रमांकाचे पॅडी वीडर नंदोरी (ता. भद्रावती) येथील प्रशांत अहीरकर यांना तर पाचव्या क्रमांकाचे पावर वीडर आमडी (ता. बल्लारपूर) येथील सुभाष तेलतुंबडे यांना मिळाले. याशिवाय पाच विजेत्यांना चाप कटर, पाच विजेत्यांना भाजीपाला किट, 10 विजेत्यांना पॉवर स्प्रेअर, पाच जणांना आटा चक्की अशी बक्षीसे देण्यात आली. यावेळी उपस्थित असलेल्या शेतक–यांचासुध्दा सन्मान करण्यात आला. प्रथमच लकी ड्रॉ च्या माध्यमातून शेतक–यांना आकर्षक बक्षीसे मिळाल्याने शेतक–यांनी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांचे आभार मानले.

# सोयाबीनवरील पिवळा मोझेक बाधित शेतकऱ्यांना 78 कोटी रुपयांचा विमा मंजूर

## आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** लोहा कंधार मतदारसंघातील हजारो हेक्टर मधील खरीप हंगाम 2023 मध्ये सोयाबीन पिकावर पिवळा मोझेक रोगाची बाधा झाल्याने मतदारसंघातील सोयाबीन पिकाचे हजारो हेक्टर क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले होते यामुळे मतदार संघातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या प्रचंड हवालदिल झाला असताना लोहा-कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी नोव्हेंबर 2023 मध्ये नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत सह मंत्रालय स्तरावर सोयाबीन बाधित शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत मिळावी म्हणून वेळोवेळी पाठपुरावा करून मतदारसंघातील सोयाबीनवरील पिवळ्या मोझेक बाधित शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करण्याची मागणी लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी वेळोवेळी तळमळीने केली होती, काल दि.०७ जानेवारी रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये सोयाबीन वरील पिवळा मोझेक बाधित शेतकऱ्यांचा मुद्दा आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी लावून धरल्यानंतर नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी मतदारसंघातील सोयाबीन वरील पिवळा मोझेक बाधित शेतकऱ्यांना 78 कोटी रुपये विमा निधी मंजूर केला असल्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आमदार श्यामसुंदर शिंदे यांना सांगितले, आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या वेळोवेळी तळमळीच्या पाठपुराला यश आले असून मतदारसंघातील सोयाबीन वरील पिवळा मोझेक बाधित शेतकऱ्यांना आमदार शिंदे यांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार शिंदे यांनी पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्याकडे माळेगाव यात्रेचे भव्य स्वरूप पाहता जिल्हा परिषद नांदेड चा निधी कमी पडत असून डीपीडीसीच्या माध्यमातून माळेगाव यात्रेसाठी एक कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याची मागणी आमदार शिंदे यांनी पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्याकडे केली असता पालकमंत्री महाजन यांनी एक कोटी रुपयांचा निधी यापुढे माळेगाव यात्रेसाठी राखीव राहणार असल्याची ग्वाही पालकमंत्री यांनी आमदार शिंदे यांना दिली असल्याने माळेगाव यात्रेला यापुढे आमदार शामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून वैभव मिळणार आहे. मतदारसंघातील अनेक गावात स्मशानभूमीचा प्रश्न



जटिल असल्याचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी बैठकीत सांगून मतदारसंघातील अनेक गावात स्मशानभूमी नाहीच तर काही जागी जाळ्या नाहीत तर काही स्मशानभूमीला स्लॅप व कंपाऊंड नसल्याचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी बैठकीत सांगितल्यानंतर मतदारसंघातील सर्व गावातील स्मशानभूमी या अद्यावत करण्यासाठी निधीची कमतरता भासणार नसून मतदारसंघातील स्मशानभूमीसाठी भरीव निधी उपलब्ध करून देणार असल्याचे पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांनी आमदार शिंदे यांना आश्वासन दिले आहे. मतदारसंघातील वीज, कृषी, शिक्षण,सह अनेक विषयावर आमदार शिंदे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आवाज उठविला आहे, खरीप हंगामातील सोयाबीन पिकावर पडलेल्या पिवळा मोझेक बाधित शेतकऱ्यांना 78 कोटींची भरीव मदत लोहा कंधार मतदारसंघातील शेतकरी बांधवांना वेळोवेळी तळमळीने पाठपुरावा करून मिळवून दिल्याबद्दल लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे मतदारसंघातील सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने अभिनंदन व कौतूक होत असून निसर्गाच्या सततच्या लहरीपणामुळे लोहा कंधार मतदारसंघातील शेतकरी बांधव आर्थिक दृष्ट्या मेटाकूटीला आला असता मतदारसंघातील शेतकरी बांधवांना 78 कोटी रुपयांची भरीव आर्थिक मदत मिळवून दिल्याबद्दल लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे मतदारसंघातील सर्व शेतकरी बांधवातून कौतुक व अभिनंदन होत आहे, हा 78 कोटीचा सर्वाधिक निधी नांदेड जिल्ह्यातील लोहा व कंधार तालुक्याला आमदार शिंदे यांच्या सततच्या तळमळीच्या पाठपुराव्यामुळे मिळाला असल्याने मतदारसंघातील शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# एकच शिक्षिका करते शाळेचा सांभाळ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील कुसुंबा जवळील भराडीपाडा अनेक वर्षांपासून शिक्षक कमतरतेमुळे विध्यर्थ्यांचे होत आहेत हाल अनेक दिवसापासून मुख्याधिपीका नीलिमा वाघ ह्या तब्बत ४० विद्यार्थ्यांना एखट्या सांभाळ करतांना दिसून आले. भराडी पाडा येथे ह्या जिल्हा परिषद शाळेच्या आवारात सुरत बायपास हायवे आहे विध्यार्थी शिक्षण घेत असताना एका विद्यार्थ्यांचा त्या रस्त्या नजीक मोठा अपघात झाला होता अश्या प्रकारे त्या ठिकाणी अनेक घटना होत असतात. अशाप्रकारे माहिती मिळताच धुळे जिल्ह्यातील आधुनिक केसरी ची टीम त्या ठिकाणी रवाना झाली व त्या ठिकाणी खूप वाईट चित्र पाहायला मिळाले त्या ठिकाणी 40 विद्यार्थ्यांचा सांभाळ चक्क एकच शिक्षिका करत होत्या. येथील जिल्हा परिषद शाळेतील अनेक शिक्षकांच्या बदल्या झाल्या



असून गेल्या आठ वर्षापासून विद्यार्थ्यांना शिकवतील अशा प्रकारे कुठलेही शिक्षक उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे तेथील लहान बालकांचा शिक्षण व भविष्याचा प्रश्न खूप गंभीर आहे. या ठिकाणी असे प्रश्न निर्माण होतात की इतक्या वर्षापासून या भराडीपाडा येथील सरपंच व जिल्हा परिषद अधिकाऱ्यांच्या असा कारभार लक्षात येत नसेल का....? त्या एकट्या शिक्षिका संपूर्ण शाळा कशा भरवत असतील...? कित्येक वर्षापासून मुलांचे शिक्षण कसे झाले असेल त्यांचा बुद्धीचा विकास कसा होत असेल...? अशा शेकडो प्रश्नांनी भरलेल्या या भराडी पाडा शाळेत फक्त आणि फक्त प्रश्नचिन्हच निर्माण होतात.

# दिव्यांग बांधवांनी केले कळसुबाई शिखर सर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** महाराष्टातील चढाई साठी सर्वांत ऊंच असलेले कळसूबाई शिखर येथे शिवऊर्जा प्रतीष्ठानकडून गेल्या बारा वर्षापासून दिव्यांगाना शिवऊर्जा प्रतीष्ठान चे अध्यक्ष शिवाजी अन्ना गाढे पैठन व सचीव असलेले कचरु चांभारे रा. बीड यांचे कडून साद घातली जाते - गेल्या बारावर्षात चारशेचे आसपास दिव्यांगानी कळसुबाई शिखर सर केले यावर्षात मावळत्या वर्षाच्या सध्येला 84 दिव्यांग बाधंवानी डीसेबर23 ला निरोप देत ईग्रजी नववर्षाची सोनेरी पहाटेचे व कळसूमातेचे दर्शन घेऊन नागमोडी खाचखडगे दरी लोंखडी शिड्यावरुन सरळ ऊतराई करुन आपणही धडधाकड मानसापेक्षा कमी नाही हे दाखवुन दिले या 84 दिव्यांगबांधवा मधे जील्यातुन पातुर तालूक्यातील हरीदास पाटील पाचपोर बाभूळगाव व दिग्रसचे सूरेश



फाळके यांनी कठिन डोंगर चढाई करुन नरवर्षाला सलामी दिली यावेळी पुरस्कार प्राप्त सूनिल वानखडे ऊरळ पुरस्कारीत बाळासाहेब नेरकर सागर ईगंळे गणेश निंबोकार गजानन रोकडे, रविद्र भवाने नम्रता चामलाटे, बाळासाहेब नेरकर ईत्यांदीनी त्यांच्या दिव्याग बांधव म्हनून अभिनंदन केले हेऊठ अपगाजागा हो ऐकतेचा धागा हो कळसूबाई शिखर चढाई मोहीमेत या सर्व विराना शिवऊर्जा प्रतीष्ठान कडुन त्या विभागाचे आमदार डा लहामटे तहसिलदार सतिष शेटे दै गावकरी समर्थ चे संपादक विश्वास अरोटे यांप्रमूख अतीथीच्या हस्ते शिव ऊर्जा प्रतिष्ठान कडुन सस्थेचे गौरवप्रमानपत्र देऊन सन्मानीत करन्यात आले.

# निर्दयी माता

आधुनिक केसरी

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी, असे म्हणतात. कलीयुगात या म्हणीला छेद देण्याच्या घटना घडत असल्यामुळे मन सुन्न होत आहे. 'माईंडफुल एआय लॅब' या आर्टिफिशिअल इंटेलिजन्स कंपनीची सीईओ सूचना सेठ हिने पोटच्या मुलाची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सूचनाने चार वर्षांच्या चिमुरड्याचा खून करुन त्याचा मृतदेह बॅगेत टाकला आणि ती गोव्याहून कर्नाटकच्या दिशेने निघाली होती. परंतु हॉटेल स्टाफला संशय आल्यानंतर चक्रं फिरली आणि पोलिसांनी तिला ताब्यात घेतलं. कर्नाटकातील चित्रदुर्ग येथे राहणारी सूचना आपल्या मुलासह गोव्यातील एक हॉटेलमध्ये वास्तव्यास होती. घटस्फोटित पतीसह मुलाची भेट होऊ नये, यासाठी सूचनाने टोकाचं पाऊल उचलल्याचा आरोप आहे. सूचना सेठ गोव्यातील कँडोलिम येथील एका हॉटेलमध्ये आपल्या मुलासोबत राहत होती. हॉटेलमधून चेकआऊट करुन बाहेर पडत असताना तिचा चार वर्षांचा मुलगा तिच्यासोबत नव्हता. ती एकटी निघत असल्याचे पाहून हॉटेल कर्मचाऱ्यांना संशय आला, त्यांनी विचारणा केली असता, मुलाला आधीच घरी पाठवल्याचा दावा तिने केला. सूचनाने हॉटेलमधून चेक आऊट केल्यानंतर कर्मचारी तिची खोली साफ करण्यासाठी गेले, तेव्हा तिथे त्यांना रक्ताचे डाग पाहून धक्काच बसला आणि त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणी तात्काळ कारवाई करत सूचना ज्या टॅक्सीतून हॉटेलमधून बाहेर पडली होती, त्या टॅक्सी चालकाचा फोन नंबर शोधून काढला. त्याला संपूर्ण प्रकरण सांगितले. सूचनाला संशय येऊ नये म्हणून त्याला कोकणी भाषेत संवाद साधायला सांगितलं. पोलिसांशी झालेल्या संभाषणानंतर टॅक्सी चालकाने तिला कर्नाटकातील चित्रदुर्ग भागातील पोलिस ठाण्यात नेले. अशा प्रकारे आरोपी आई सूचना सेठ पोलिसांच्या जाळ्यात अडकली. तिथून पुढे गोवा पोलिसांनी चित्रदुर्ग गाठून तिला अटक केली. सूचना सेठची 'माईंडफुल एआय लॅब' ही कंपनी डेटा सायन्स टीम आणि स्टार्टअप्सना सल्ला देण्याचे काम करते. यासोबतच ते मशीन लर्निंग सोल्यूशन्सही देतात. सूचनाला या क्षेत्रात १२ वर्षांचा अनुभव आहे. २०२० मध्ये एआय एथिक्समधील टॉप १०० प्रतिभावान महिलांमध्ये तिचा समावेश झाला होता. सूचना सेठच्या लिंक्डइन अकाऊण्टनुसार तिने हार्वर्ड विद्यापीठाच्या बर्कमन क्लेन सेंटरमध्ये फेलोशिप केली आहे. २०२० मध्ये तिने 'द माईंडफुल एआय लॅब' या स्टार्टअपची सुरुवात केली. तिच्याकडे आर्टिफिशियल लँग्वेज, मशीन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग आणि टेक्स्ट मेलिंग या क्षेत्रात चार अमेरिकन पेटंट्स आहेत.

# चांगुलपणा

आधुनिक केसरी

लोकांनी आपल्याबद्दल काही पण विचार केला तरी आपल्याला तोपर्यंत फरक पडायला नको जोपर्यंत आपण स्वतः च्या नजरेत चांगले राहु. त्यामुळे लोकांना खुष ठेवण्याची किंवा त्याची कारण नसताना स्तुती करायची गरज नाही. आपण लोकांमध्ये असलो तरी स्वतंत्र व्यक्तीमत्व असायला हवं आपण जसे आहोत तसे असायला हवं. दिखावेपणाचा मुखवटा घालून उपयोग नसतो. अस करून आपण इतरांची सोडा स्वतःची फसवणूक करत असतो. तसच काही लोकांना आपल्यात चांगल बघायचं असतं तर काहींना वाईट. शेवटी हे समोरच्या व्यक्तीच्या दृष्टीकोनावर अवलंबून असतं कुणी आपल्याला चांगल म्हणावं याला अर्थ नसतो तर आपण आपला मुळ स्वभाव आहे तसा दाखवायला हवा . स्वतः शी प्रामाणिक राहायला हवं . कारण जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत असणारा जवळचा साथीदार आपण स्वतः असतो. म्हणून स्वतः च ध्येय पुर्ण करायला, स्वःताची प्रगती करायला, चांगली कौशल्ये आत्मसात करायला शिकायला हवं कारण आपल्याला जगाच्या नाही तर स्वतः च्या नजरेत चांगल बनायचं आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# माणसे चिरडून मारू,पण कायदा नको ?

आधुनिक केसरी

**भारतात संसदेत मंजूर केलेल्या कायद्याला रस्त्यावर आंदोलन करुन ते कायदे मागे घेण्याची फॅशन सुरू झाली आहे! कृषि कायद्याबाबत असेच झाले! मग संसदेत लोकप्रतिनिधीची गरज आहे काय? केंद्र सरकारने ब्रिटीशकालिन कायदे रद्द करून त्याजागी भारतीय कायदे अस्तित्वात आणले आहेत.या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत! त्यात हिट अँड रन' या अपघातात शिक्षा व दंडाची वाढ करण्यात आली.पण हा कायदा चालका विरोधात असा भ्रम विरोधकांनी पसरविला,त्यातून देशभर ट्रक चालकाने चक्का जाम आंदोलन केले.यामागे राजकारण आहे,हे निश्चितच!**

भारतात स्वातंत्र्यानंतर वाहनांची संख्या केवळ हजार होती. त्यानंतर दरवर्षी वाहनांच्या संख्येत वाढ होत गेली आहे.या वाहन नोंदणी व नियमासाठी १९८८ मोटर वाहन कायदा अस्तित्वात आणला केला.या कायद्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. आज तर भारत कार उत्पादन विक्रीत जगात चौथ्या क्रमांकावर आहे.देशातील वाहनांची संख्या २०२१-२०२२ मध्ये २२ कोटी व ९३ लाख इतकी होती.यात १ कोटी ७७ लाख दुचाकी वाहने आहेत.आज मध्यममर्गीय माणसाकडे चार चाकी वाहने आहेत. ग्रामीण भागात शेतकरी दुध विक्रते,भाजी आदी विक्रेत्यांकडे दुचाकी वाहने आहेत! म्हणजे आमच्या गाडी असणे भूषण समजले जाते.मोठ्या शहरात रस्त्यावर तर मुंग्यासारख्या गाड्यांची रांग पहावयाला मिळते. केंद्र शासनाला पेट्रोल व डिझेल आयातीवर मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करावा लागते.आज ग्रामीण भागात घरोघरी गॅस पुरवठा होत आहे.त्यामुळे चूल बंद झाली असेच म्हणावे लागेल.आज रॉकेल बद पुरवठा होत नाही.तेंव्हा गरिबांना कमी किमतीत रॉकेल मिळावे,म्हणून करोडाचे अनुदान दिले जात असे!त्याप्रमाणे गॅस सिलेंडर अनुदान दिले जात होते.पण धनदांडग्यांनी कोट्यवधीची अनुदान लाटले आहे.राजकीय नेत्यांनी परवाने घेवून काळाबाजार करुन उखळ पांढरे करुन घेतले.आजही केंद्र व राज्य सरकार पेट्रोल व डिझेलवर स्वतंत्र कर आहे.हे केंद्र व राज्य शासनाचे उत्पन्नाचे मोठे स्त्रोस्त्र आहे.काँग्रेसने जाता जाता इंधनाचे दर कमी करण्यासाठी १.३० लाख कोटीचे ऑईल बाँड काढले होते. याची परतफेड २०१४ पासून करावयाची आहे.आतापर्यत मोदी सरकारने ३१ हजार १५० कोटी भरले आहेत.मोदी सरकारला ४१ हजार कोटीचे देणे आहे. तसेच २० हजार कोटीचे व्याज द्यावे लागणार आहे.काँग्रेस नेते हीबाब सांगत नाहीत.तरी आज देशात पेट्रोल,पेट्राल गॅसचे भवस्थीर आहेत!याचा तुटवडाही नाही.साधारणपणे पेट्रोलची किंमत शंभर व थोडीफार अधिक आहे.यात केंद्र व राज्य नऊ महिन्यात ५४५ हजार २ कोटी कर मिळालेला आहे. देशभरात वाहनांची संख्या दरवर्षी वाढत चालली आहे. त्याचबरोबर रस्त्यांवरील अपघाताची संख्या व मृत्यूची संख्या वाढत चालली आहे.देशात२०२२ मध्ये सुमारे ४ लाख ६१ हजार ३१२ वाहन अपघात झाले.त्यात १ लाख ६८ हजार ४९१ जणांनी प्राण गमावले.यात १८ ते ४५ वयाचे मृत्यूचे प्रमाण ६६.५२ टक्के आहे.या अपघातात कायमचे अपंग झाल्याचे संख्या १० लाखाच्यावर आहे.ज्यांच्या घरातील वडील, मुलगा, भाऊ गमवतो.ज्या परिवार संकट कोसळले,त्यांनाच दुःख माहित असते.वाहन अपघात हे माणसाच्या निष्काळजीपणामुळे होतत. तरी आपण यावर अजून गंभीरपणे विचार होत नाही! देशात अपघातात होत असतात,माणसे मरत असतात,त्यात काय विशेष!असे म्हणणाऱ्या प्रवृत्ती आहेत.देशात अपघात टाळता येवू शकतात! त्यासाठी परिवहनमंत्री नितीन गडकरी शासन मोटार वाहन कायदा २०१९ मध्ये आणला.यात कायद्यात वहातूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्याना दहा दंड देण्याची तरतूद केली.याही कायद्याला लोकांनी विरोध केला होता. चारचाकी वाहन चालकाने सुरक्षेचा पट्टा लावला नाही तर शंभर रुपये दंड होता.तरी लोक शंभर रुपये देवून टाकू तरीही पट्टा लावतच नव्हते! आता एक हजार रूपये दंड लावला जात आहे.दुचाकी वाहन चालकाने हेल्मेट लावणे सक्तीचे केले , ते कोणाकरिता? त्याचा जीव वाचावा म्हणून!याही दंडात वाढ झाली. पुणे शहर तर ज्ञानवंताचे, विचारवंताचे मानले जाते, या पुणेकरांनी हेल्मेट सक्तीला विरोध केला. रुग्णवाहिनी जाताना रस्ता अडविला तर दहा हजार रुपये दंड व तीन महिन्याची शिक्षेची तरतूद आहे.तसेच वाहन परवाना नसणे,दारू पिऊन गाडी चालविणे,भर वेगात वाहन चालविणे,तसेच वाहन अल्पवयीन मुलांना चालविण्यास देणे त्यासाठी दंड व शिक्षेची या कायद्यात आहे. परिवहन कायद्यात दंड व शिक्षेचे तरतूद केली गेली.त्यामुळे किमान वाहन चालक नियमाचे पालन करत आहेत.सर्वांना दंड व शिक्षा दिला जाते काय? शिक्षा देण्याचे अधिकार न्यायालयाचे आहे.तेंव्हाही परिवहन कायद्याचा विरोध केला होता.आज या कायद्याची अमंलबजावणी चालू आहे.आज देशात वाहतूक विभागाचे कर्मचारी हे लपून छायाचित्र काढून दंडात्मक कारवाई करतात! हे चुकीचे आहे.यात एखादे वाहने दुसऱ्या राज्यात व अथवा जिल्ह्यात गेले की,वाहनांचा क्रमांक पाहून दंडाची कारवाई केली जाते.दंडची कारवाई ही वहातूक सुधारावी,असा उद्देश नाही केवळ दंडाचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी नाही. त्यासाठी दंडाचा बडगा उभारला जातोय!यात चालकाना समज दिली जात नाही अथवा बाजू ऐकून घेतली जात नाही.हे मात्र अति होत चालले आहे!यामुळे लोकांत असंतोष वाढत चालला आहे.'हिट अँड रन' मध्ये चालक बेधूंदपणे वाहन चालवून माणसाला चिरडून पळून जातो.त्याला माणसाच्या जीवाची पर्वा नसते. ना! कायद्याची भीती.अश्या घटना सत्ता आणि पैश्याची मस्तीतून होत असतात.जे लोकांना कायदा आपल्या खिशात आहे,असे वाटते! सिने कलावंत सलमानखान २८ सप्टेंबर २००२ रोजी दारूच्या नशेत वाहन फुटपाथवर नेले.यात तेथे झोपलेले या अपघातात गरीब माणसे मेली, तर काही जण जखमी झाली!या अपघाताचे काय झाले? सलमान खान हा तेरा वर्षे न्यायालयात गेला नाही! त्यांनी सर्व आरोप फेटाळले होते.पण जेंव्हा न्यायालयाने त्यांना पाच वर्षाची शिक्षा सुनावली तेंव्हा त्यांना रडला होता तेंव्हा देशात कायदा सर्वांसाठी समान आहे,प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे.



त्याची भीती असली पाहिजे.तेंव्हा तर फुटपाथ हे झोपण्यासाठी आहेत काय? असा प्रश्न विचारला गेला होता?आजही सलमानखान मोकळा आहे.अश्या 'हिट अँड रन'वर जॉली एल. एल. बी.नावाचा हिंदी चित्रपट आहे.हे अपघात नव्हे!ते घडविले जातात. दिल्लीत तरुणांनी एका तरुणीला कारखाली चिरडत टाकल्याची घटना आहेअश्या घटना म्हणजे 'हिट अँड रन' होत!अश्या घटनेत दरवर्षी ५० हजार लोकांचा बळी जातोय! राष्ट्रीय नोंद विभागानुसार-२०२०- ४१ हजार १९६. तर २०२१- ४३ हजार ४९९ ,२०२२ -४७ हजार ८०६ गुन्ह्याची नोंद झाली आहे.अश्या घटना सतत वाढत होत्या. केंद्रियमंत्री अमित शहा यांनी ब्रिटीशकालीन कायद्याच्या जागी भारतीय कायद्याचे विधेयक ११ ऑगस्ट२०२३ मध्ये संसदेत आणले होते. पण ते स्थायी समितीकडे पाठविण्यात आले होते.त्यात पंतप्रधान मोदी व भाजपा सरकारचे डिसेंबर महिन्याचे शेवटचे अधिवेशन कारण फेब्रुवारी२०२४ महिन्यात अर्थ संकल्पिय अधिवेशन होईल. मार्च महिन्यात लोकसभा निवडणूका जाहीर होण्याची शक्यता आहे.त्यामुळे मोदी सरकारने डिसेंबरच्या अधिवेशनात महत्वपूर्ण विधेयके आणणार,याची विरोधी पक्षांना कल्पना होती होती सरकार विरोधी पक्षांना माहिती देत असते. पण इंडिया आघाडीच्या नेत्यांची मोदी सरकारला काम करू द्यावयाचे नव्हते,अशी रणनीती ठरली होती! त्यात दि १३ डिसेंबर रोजी दोन तरुणांनी संसदेत घुसखोरी केली.काँग्रेससह विरोधी पक्षांनी गोंधळ, ओरडे,घोषणाबाजी करणे या घटनेचे राजकारण केले.यामुळे दोन्ही सभागृहातील१४१ सदस्यांना संसदीय नियमांचे उल्लंघन केल्यामुळे निलंबित केले गेले.विरोधी पक्ष नेत्यांना संसदेतील येणारी विधेयके महत्वाची वाटली नाहीत. त्यांना घुसखोरीचा प्रश्न यापेक्षा महत्वाचा वाटला!त्यात पुन्हा! मोदी सरकार आम्हाला बोलू देत नाहीविरोधी पक्ष सदस्यांना निलंबित करुन लोकशाही हत्या केली गेली?असा कांगावा त्यांनी गेला.विरोधी पक्षांनी संसदेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. संसदतून पळ काढणे आहे.यामुळे संसदेचे काम बंद करता येत नाही, संसदेचे इतर विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहात होते.केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी ब्रिटीशकालीन कायदे रद्द करणारे तीन विधेयके म्हणजे भारतीय न्याय संहिता २०२३ आणि भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष्य संहिता २०२३ हे लोकसभेत २० व २१ डिसेंबर २०२३ राज्यसभेत आणले. त्यावर दोन्ही सभागृहात चर्चा झाली. शेवटी तीनही कायदे संमत झाले.या तीनही कायद्यावर दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपती मुर्मू यांची सही झाली आहे. देशासाठी हे तीन कायदे अतिशय महत्वाचे आहेत.संसदेत ही विधेयके समंत होणार,याची इंडिया आघाडीच्या नेत्यांना कल्पना होती.त्यामुळे त्यांनी राजकीय नाटकबाजी केली. लोकशाहीत संसद हे चर्चा ,प्रश्न उपस्थित करण्याचे माध्यम आहे. काँग्रेससह विरोधी पक्षांनी या विधेयकावर चर्चा करण्याची संधी गमावली आहे.या विधेयकात महत्वाचा राजद्रोह कायदा इंग्रजाच्या काळापासून चालत होता,तो रद्द केला गेला. त्याजागी देशद्रोह कायदा आणला गेला आहे.आता सरकारवर टीका करणे म्हणजे देशद्रोहहे स्पष्ट केले गेले,या कायद्याबाबत व्याख्या नव्हती.आता कठोर शिक्षेची तरतूद केली गेली.मॉंबलिचिंग' चा कायदा केला गेला.यात फाशीची शिक्षेची तरतूद केली.तसेच अतिरेक्यांना कठोर शिक्षेची तरतूद केली गेली आहे. त्याप्रमाणे महिला व मुलावर अत्याचार करणाऱ्याच्या शिक्षेत वाढ केली. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली त्या गुलामीचे कायदे काँग्रसने चालूच ठेवले! या कायद्याची देशभरात याची चर्चा झाली नाही. या नवीन कायद्यात' हिट अँड रन' कायद्याच्या दंड व शिक्षेत वाढ केली गेली आहे! त्यावरुन देशात गदारोळ उठविला आहे.पण इतर राष्ट्रात भारतापेक्षा वाहन व वहातुकीचे कायदे अतिशय कठोर आहेत.पूर्वीच्या भा.द,वि च्या कलमात २७९ मध्ये वाहन निष्काळजीपणे चालविणे, तर कलम ३०४ (अ) निष्काळजीपणामुळे मृत्यू,कलम ३३८ दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणे,या कलमाखाली दोषी ठरल्यास दोन वर्षाची शिक्षा तरतूद होती. नवीन कायद्यात वाहन चालकाने अपघात करुन पळून गेला.तरच दहा वर्षाची शिक्षा तरतूद व सात लाखाची दंडाची तरतूद आहे. अपघातानंतर वाहन चालक जर जमावाच्या हल्याची भीती असेल अशावेळी त्याने जवळच्या पोलिस स्टेशनला जाऊन किंवा १०८ क्रमांकावर फोन करुन माहिती देऊ शकतो.जर अपघातानंतर चालकाने पोलिसांना कळविले पाहिजे.अशावर कठोर कलमाखाली खटला चालविला जाणार नाही, अशी या कायद्यात उल्लेख आहे.पण तत्कालिन परिवहन मंत्री व काँग्रेस नेता प्रतापसिंह खाचारियावास यांनी मात्र हा कायदा लोक विरोधी व घटना विरोधी असे म्हणत विरोध केला.पण मोदी विरोधकांनी कायद्याची ट्रक चालकांना भीती दाखविली गेली हा कायदा म्हणजे बागलबूवा आहे ? असे भसविले गेले.यात सोशल मिडीयावर तर या कायद्यामुळे सर्वच ट्रक चालक जेलमध्ये जाणार! त्यांना७ ला लाखाचा दंड भरावा लागणार.हा काळा कायदा आहे,यातून मोदी सरकारने रद्द करावा.अशी मागणी केली गेली.देशभरात ट्रकचालक रस्त्यावर उतरले.ट्रक चालकांनी चक्का जाम आंदोलन केले. यामुळे देशात जीवनावश्यक वस्तु कमतरता भासेल.यातून पेट्रोल व डिझेलची गंभीर समस्या निर्माण होईल. देशात गोंधळाचे व अराजकतेचे वातावरण निर्माण होईल.यात मोदी व भाजपा सरकारच्या विरोधात वातावरण निर्माण जाईल,याच उद्देशाने ट्रक चालकांच्या भावना भडकविल्या गेल्या.त्यामुळे ट्रक चालक रस्त्यावर उतरले.नंतर वाहतूक संघटनेच्या शिष्टमंडळाने गृहमंत्री शहा याची भेट घेतली. त्यानंतर ट्रक चालकांनी चक्का आंदोलन मागे घेतले.एखाद्या कायदा सरकारला मागे घ्यावयाचा असेल तर त्याबाबत पुन्हा संसदेत प्रस्ताव आणावा लागतो.जे कृषी कायद्याबाबत जे घडले तसेच हा कायदा व्हावा रद्द म्हणून दवाब आणला जात होता,तसे विरोधनी कारस्थान रचले होते.दुसरीकडे सामान्य माणूस या कायद्याचे स्वागत करत आहे 'हिट अँड रन हा' कायदा माणसाचे प्राण वाचविणे, अपघात पिडीतांना न्याय देधारा आहे.किमान या कठोर कायद्यामुळे भीतीमुळे चालक वाहने काळजीपूर्वक चालवतील यात अनेकांचे प्राण वाचतील. देशातखून प्रकरणात फाशीची तरतूद आहे,पण सर्वांना फाशी होते काय?कारण देशात शंभर गुन्हेगार सुटले तर चालतील एकाही निरपराध व्यक्तीला शिक्षा होत कामा नये,या उदात्त भावनाने भारताची न्याय संस्था करत असते. त्यामुळे गंभीर गुन्ह्यातील आरोपी सुटतात.तेंव्हा या नवीन कायद्यात सरसकट शिक्षा व दंड दिला जाईल,असे नाही,जे दोषी ठरतील त्यांनाच दंड व शिक्षा होईल,ते न्याय संस्थेचे काम आहे,तेंव्हा भारतीय कायद्यावर विश्वास ठेवला पाहिजे. पण अपघातात माणसे मेले तरी चालतील पण कायदाच नको! ही जी मानसिकता आहे,ती बदलली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समाजाच्या कल्याणासाठी पत्रकारिता करा

## ज्येष्ठ संपादक शैलेश पांडे : गोंडवाना विद्यापीठात पत्रकार दिन

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ जिवंत ठेवला तर लोकतंत्र बळकट होईल, ज्या देशातील माध्यमे मजबूत असतात त्या देशात लोकशाही मजबूत असते. समाजाच्या कल्याणासाठी पत्रकारिता करा, हीच खरी बाळशास्त्री जांभेकर यांना आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन तरुण भारता वृत्तपत्राच्या डिजिटल आवृत्तीचे जेष्ठ संपादक आणि साहित्यिक, लेखक शैलेश पांडे यांनी केले. गोंडवाना विद्यापीठात जनसंवाद विभागाच्या वतीने नुकताच आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त मराठी पत्रकार दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे हे होते. तर कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना



कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले की, भारतात 2000 सालापासून अनेकांच्या हातात मोबाईल आले, यामुळं सामाजाच्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये स्थितांतर होत आहे, तीच स्थितांतर माध्यमांमध्येही आली, चॅनल्स आणि मोबाईल मध्ये अनेकजण बातम्या बघतात, मात्र, वृत्तपत्रांचं महत्व कमी झाले नाही. आजही अनेकजण सकाळी वृत्तपत्र वाचतात. चौथ्या स्तंभाचं महत्त्व बाळशास्त्री जांभेकर यांच्या काळात होतं तेवढंच आजही आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ मोठं काम करू शकतो. म्हणूनच चौथ्या खांबाचे महत्व अधोरेखित होतं. चांगले पत्रकार गोंडवाना विद्यापीठातुन बाहेर पडावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शैलेश पांडे यांनी सांगितले की, मुद्रित माध्यमांची पायाभरणी तसेच पत्रकारांमध्ये चौफेर विद्वत्तेच्या परंपरेची पायाभरणी बाळशास्त्री जांभेकर यांनीच केली. लोकशाहीच्या तीन खांबांना कायदे आहेत, मात्र चवथ्या खांब असलेल्या पत्रकारांसाठी कायदे नाही, विशेषाधिकार नाही, मात्र तरीही त्यांचे योगदान आहे, कारण ही माणसे व्रतस्थ आहेत.असेही ते म्हणाले कार्यक्रमाचे संचालन स. प्रा. डॉ. संजय डाफ यांनी तर आभार स.प्रा. डॉ. सरफराज अन्सारी यांनी केले. प्रस्ताविक स.प्रा.रोहित कांबळे यांनी तर प्रमुख वक्ते यांचा परिचय स. प्रा.चैतन्य शिनखेडे यांनी करून दिला. यावेळी जनसंवाद विभागाच्या समन्वयिका डॉ. रजनी वाढई, स.प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# जळगाव महापालिकेचा थकबाकीदारांना दणका

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महापालिका प्रशासनाकडून थकबाकी वसुलीसाठी आता व्यापाऱ्यांच्या मालमत्ता गोठविण्याची कारवाई सुरु करण्यात आली असून, बाजार समितीतील १२ दुकाने गोठविण्यात आली आहेत. कारवाई टाळण्यासाठी २४ जणांनी थकबाकीचा तब्बल नऊ लाखांचा भरणा केला. महापालिका प्रशासनाकडून रहिवासी मालमत्तांशिवाय आता व्यापाऱ्यांच्या मालमत्तांवरही कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. प्रभाग समिती क्रमांक तीनअंतर्गत येणाऱ्या बाजार समिती परिसरातील ६४ दुकानदारांकडे मालमत्ता करापोटी सुमारे २८ लाख रुपये थकबाकी होती. त्यांना महापालिका प्रशासनाकडून त्या कारणास्तव अधिपत्र बजावण्यात आले होते; परंतु संबंधित ६४ दुकानदारांनी दिलेल्या मुदतीत थकबाकी कराचा भरणा केला नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून प्रभाग अधिकारी एस. एस. पाटील आणि प्रकाश सोनवणे यांच्या नेतृत्वात प्रत्येकी १० कर्मचाऱ्यांची दोन पथके नियुक्त करुन १२ दुकाने गोठविण्यात आली. २४ दुकानदारांनी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी भीतीपोटी आणि ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता थकबाकी करापोटी सुमारे नऊ लाखांचा भरणा केला. दरम्यान, बाजार समितीत ८५० गाळे असून, पैकी तीन-चार वर्षांपासून थकबाकीदार असलेल्या ६४ दुकानदारांची यादी तयार करण्यात आली.



# फुलंब्री येथे संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे आज श्री.संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी तेली समाज सभागृहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच तेली गल्ली येथे असलेला संताजी चौक येथे देखील पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले..

यावेळी राधा रमेश मिसाळ या मुलीने श्री विठ्ठल व संत जगनाडे महाराज यांची प्रतिमा रांगोळीच्या माध्यमातून साकारली. संत जगनाडे महाराजांच्या सभागृहात सुमारे 30 फुटापर्यंत ही रांगोळी साकारल्याने सर्वांनीच त्यांचे कौतुक केले.याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ, भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे फुलंब्री शहराध्यक्ष सुरेश मिसाळ,फुलंब्री युवकचे तालुकाध्यक्ष वैभव दुतोंडे, फुलंब्री युवकचे शहराध्यक्ष अक्षय पाडळकर तसेच गंगाधर तावडे, प्रल्हादशेठ मिसाळ, मधुकर दुतोंडे, सदाशिव तावडे, रामदास तावडे, कांता आढाव, उत्तम आढाव, रमेश राऊत, प्रमोद मिसाळ, अंबादास तावडे, गंगाधर दुतोंडे, जगन तावडे, शिवनाथ दुतोंडे, रमेश मिसाळ, रत्नाकर आढाव, काशिनाथ दुतोंडे, भाऊसाहेब आढाव, ज्ञानेश्वर तावडे, अशोक राऊत, सतिष दुतोंडे, गणेश तावडे, अनिल दुतोंडे, ताराचंद दुतोंडे, मुरलीधर राऊत, राजू मिसाळ, सतीश मिसाळ, लक्ष्मण पिंजारी, रत्नाकर आढाव, योगेश तावडे, पुनम दुतोंडे, अर्जुन राऊत, प्रकाश लोखंडे, मच्छिंद्र तावडे, दीपक राऊत, रंगनाथ दुतोंडे, शरद रोठे, गजानन तावडे, योगेश पेंढारे, रामेश्वर तावडे, उदय वाढेकर, कृष्णा दुतोंडे, सुरेश गायकवाड, विष्णु राऊत, आकाश दुतोंडे, सतीश मिसाळ, मनेश दुतोंडे, मनोज राऊत, अनिल पेंढारे, रमेश तावडे, दिनेश मिसाळ, बाळु तावडे, रवी आढाव, अक्षय आढाव, उमेश मिसाळ, संतोष आढाव, नागेश मिसाळ, ज्ञानेश्वर दुतोंडे, अमोल राऊत, अमोल मिसाळ, मनोज मिसाळ, योगेश खैरे, अजय पाडळकर, विकास मिसाळ, विजय पाडळकर, जगदीश मिसाळ, सागर माठे, संतोष मिसाळ, उमेश ठोंबरे, प्रशांत खैरे, बाळु आढाव, आकाश खैरे, विशाल मिसाळ, गणेश बजमाळी, गणेश दुतोंडे, समर्थ मिसाळ, शिवा दुतोंडे, दत्तू आढाव, गणेश मिसाळ, नागेश दुतोंडे, नितीन मिसाळ, ज्ञानेश्वर तावडे, शुभम दुतोंडे, रोहित राऊत, अमोल राऊत, किशोर दुतोंडे, संतोष सुरभैय्ये आदी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते..!

# छत्रपती संभाजीनगरमध्ये वर्षभरात 57 हजार वीजजोडण्या; महावितरणची लक्षणीय कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नवीन वीजजोडण्या देण्यासाठी महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने वेगवान व तत्पर कार्यवाही करीत 2023 मध्ये सर्व वर्गवारीमध्ये 56 हजार 697 नवीन वीजजोडण्या कार्यान्वित केल्या आहेत. तसेच नवीन वीजजोडण्या देण्यासाठी गतवर्षी लागणारा सरासरी दीड महिन्याचा कालावधीही केवळ एका आठवड्यावर आणण्यात महावितरणला यश आले आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलामध्ये दरवर्षी 40 ते 50 हजार नवीन वीजजोडण्या देण्यात येतात. मात्र यंदा वीजजोडण्या देण्यास नियोजनपूर्वक वेग देण्यात आला आहे. नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने 'इझ ऑफ लिव्हिंग' संकल्पना आणली आहे. यात वीजपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यानुसार ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्यासह सर्व सेवा तत्परतेने देण्याचे आदेश महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कर्मचाऱ्यांना दिले आहेत. यात छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने नवीन वीजजोडणी तत्परतेने देण्यासह खंडित वीजपुरवठा, बिलिंग व ग्राहकांच्या इतर तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यात राज्यात आघाडी घेतली आहे. वीज ही मूलभूत गरज आहे. ही महत्त्वाची गरज भागवण्यासाठी ग्राहकांना फारवेळ लागू नये यासाठी ग्राहकांना नवीन वीजजोडणीसह सर्व सेवा तत्परतेने देण्यावर महावितरणचा भर आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलात



सन 2023 मध्ये छत्रपती संभाजीनगर परिमंडलात जवळपास 57 हजार नवीन वीजोडण्या देण्यात आल्या ही समाधानाची व आनंदाची बाब आहे . हा वेग आणखी वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे . तसेच नियामक आयोगाच्या कृती मानकांनुसार निश्चित केलेल्या कालावधीत वीजग्राहकांना सेवा देण्यासाठी परिमंडलातील सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचारी कटिबद्ध आहेत .
– **डॉ .मुरहरी केळे, मुख्य अभियंता, महावितरण**

मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रलंबित वीजजोडणी देणे, ग्राहकांच्या वीजपुरवठ्याच्या तक्रारी, बिलिंगच्या तक्रारी, इतर तक्रारी निर्धारित कालावधीत निकाली काढणे तसेच वितरण रोहित्र वेळेत बदलणे या पाच मुद्द्यांवर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. डॉ.केळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर परिमंडलात मिशन मोडवर काम करत वीजजोडण्या देण्यासह तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलात मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे हे गतवर्षी मे महिन्याच्या अखेरीस रूजू झाल्यानंतर नवीन वीजजोडण्यांच्या प्रगतीसह वीजग्राहकांच्या तक्रारींचा व त्यावर केलेल्या उपायांचा नियमित आढावा घेत आहेत. त्यामुळे नवीन वीजजोडणी देण्याची प्रक्रिया अधिक गतिमान झाली व 2023 मध्ये सर्व वर्गवारीतील 56 हजार 697 ग्राहकांना नवीन वीजजोडणी देण्यात आली आहे. प्रलंबित जोडण्यांचे अर्जही एका आठवड्यात निकाली काढण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत वीजजोडण्या देण्यावर भर आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलात गतवर्षी मे महिन्यात नवीन जोडण्या देण्याचा सरासरी कालावधी सुमारे 45 दिवस होता. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर अभियंते, कर्मचाऱ्यांच्या नियमित बैठका घेऊन प्रलंबित जोडण्या तत्परतेने देण्याचे निर्देश दिले. त्यामुळे नवीन वीजजोडणी देण्याची सरासरी कालावधी डिसेंबरअखेरीस केवळ एका आठवड्यावर आला आहे.

# सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयात मुख्यमंत्र्यांचा संदेश वाचन

आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** जय कालिका देवी शिक्षण संस्था संचलित सावळदबारा येथील शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विद्यार्थ्यांना दिलेला संदेश याचे वाचन करण्यात आले विद्यालयाचे प्राचार्य नारायण कोलते यांनी सर्व शिक्षकांना मार्गदर्शन करून प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात आचरण करावं असा उपदेश दिला वर्ग शिक्षकांनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना हा संदेश वाचन करून दाखवीला असा होता कीप्रिय विद्यार्थी मित्रांनो, नव्या दिशेचे, नव्या उषेचे गीत सूर हे गाती, या मंगल देशाचे आहे, भविष्य अपुल्या हाती'आपल्या देशाला अनेक महापुरुषांचा महान वारसा लाभला आहे. शेतकऱ्यांनी, कष्टक-यांनी, बुद्धिवंतांनी, विचारवंतांनी आपला देश घडवला आहे. विविध प्रयोगशील व्यक्तिमत्त्वांनी रुजवलेल्या संशोधनाच्या बोजाचा वटवृक्ष झालेला आपल्याला आज पाहायला मिळतो आहे, "चांद्रयान- ३' मोहिमेच्या यशाने भारताचे नाव आता अंतराळावरही सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. या ऐतिहासिक घटनेचे आपण साक्षीदार आहोत, ही आपल्या सर्वांसाठी भाग्याची गोष्ट आहे. अंतराळ विज्ञानाकडे अभ्यासात्मक तसेच व्यवसायात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची वेळ आली आहे, हे दर्शवणारी ही घटना आहे. जनसामान्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, त्यांचे जगणे सुखकर करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरणे महत्त्वाचे आहे.आपल्या भारत देशाचे, आपल्या महाराष्ट्र राज्याचे भविष्य तुमच्या हाती आहे आणि त्याची तयारी तुम्हाला वर्तमानातच करावी लागणार आहे. शेतीपासून माहिती तंत्रज्ञानापर्यंत प्रत्येक क्षेत्राचा विज्ञानाच्या आधारे विचार करून भविष्याचा वेध घ्यायला हवा. त्यासाठीच सर्वप्रथम शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घ्यायला हवे. महाराष्ट्रातील तुम्हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा वाढण्यावर आम्ही सदैव भर दिला असून विविध शैक्षणिक सुविधा तुमच्यासाठी उपलब्ध करून




दिल्या आहेत, विद्यार्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्यावर भर देण्यात आला आहे. यात प्रामुख्याने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धात्मक अभियानाचा समावेश आहे. या अभियानांतर्गत चाकोरीबाहेरील विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळा परस्परांशी स्पर्धा करतील व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळेल. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व त्यायोगे साहित्याप्रती त्यांच्या अभिरुचीत व सामान्य ज्ञानात वाढ व्हावी, यासाठी 'महावाचन महोत्सव' हा उपक्रम राबविला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयक कामाची आवड निर्माण व्हावी तसेच लागवडीचे तंत्रज्ञान त्यांनी आत्मसात करावे यासाठी 'माझी शाळा, माझी परसबाग' हा अभिनव उपक्रम राबविला जाणार आहे. सार्वजनिक स्वच्छता व त्या माध्यमातून चांगले आरोग्य जोपासता यावे यासाठी 'स्वच्छता मॉनिटर-टप्पा २' हे अभियान राबविण्यात येणार आहे. या सर्व उपक्रमांत राज्यातील सर्व शाळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन मी या प्रसंगी करीत आहे.तुम्हा सर्वांना नोकरीच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून HCL, TISS या संस्थांबरोबर आपल्या सरकारने करार केला आहे. पूर्वी इयत्ता आठवीपासून दिले जाणारे व्यावसायिक शिक्षण आता इयत्ता सहावीपासून सुरू होत आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या अद्ययावत प्रशिक्षणाद्वारे तुमच्यापैकी सुयोग्य विद्यार्थ्यांना जर्मनीमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्या देशाशी करार करण्यात येत आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र सदरील संदेश याचे वाचन करून सर्वांना आपल्या महाराष्ट्राचा व देशाचा अभिमान वाटायला हवा हा उद्देश यामध्ये होता यावेळेस शाळेतील शिक्षक विकास पाटील विजयसिंग राजपूत,भास्कर ससाणे, सुदाम राठोड विनोद जाधव , संजय जोशी, भास्कर खमाट पोपटराव सोनवने, ज्ञानेश्वर राठोड, श्रीकृष्ण सोनुने,श्याम जाधव, मुकुंदा व्यहारे, भूषण देसले,अजबराव चव्हाण जीवन कोलते पा.राहुल बडक गणेश मोहने,जयराम घोती, दिपक शिसोदे, सुनील चव्हाण, सतीश गावंडे, योगेश शेळके, सतीश खवले, हिरालाल सोनवणे, गणेश सत्रे, मोहन बोरे, प्रदीप पाटील, सरकटे सर, बाबासाहेब कोलते सर्व विध्यार्थी व विध्यार्थीनी उपस्थित होते.

# शाळा बाह्य शाळा : चिंतनाचा विषय

आधुनिक केसरी

**मी ज्या शाळेत महाविद्यालयात शिकलो त्या शाळेना योगायोगाने भेटी देता आल्या. त्या शाळेतील आठवणी, संस्कार स्मृतिपटलावर आले. संस्काराचे धडे देणाऱ्या शिक्षकांचे चेहरे नजरेसमोर आले. शाळेतील गमती जमती आठवल्या, शिक्षकांच्या हातचा खाल्लेला मार आठवला. आज सोशल मीडिया ने जग व्यापून टाकले आहे. अनेक तोटे चर्चिल्या जात असतांना सोशल मिडियामुळेच २५-२५ वर्षांपूर्वी सोबत शिकलेले मित्र एकत्रित आले. व्हाट्स अप चे ग्रुप झाले, गेट टु गेदर च्या निमित्ताने मित्र मैत्रिणी पुन्हा एकदा एकत्रित येऊन आपल्या शाळांना भेटी द्यायला लागलेत.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

आणि जुन्या आठवणींचे गाठोडे सुटायला लागले आणि पुन्हा एकदा शाळेत जाता यायला हवं ,खिशात दमडी नसेल,फेफरमिट ची एक गोळी चिऊचा घास करून शर्टाच्या आत ठेवून दाताने फोडून आपल्यातली अर्धी गोळी मित्राला देणे असे असतांना देखील तेच आयुष्य आज लाखो रुपये कमावत असतांना ते दिवसच खऱ्या अर्थाने लाखमोलाचे वाटत आहेत.

रडून घरच्यांच्या मागे ससेमिरा लावून १५ ऑगस्ट ला शाळेचा गणवेश शक्यतो आमच्या पिढीला मिळायचा. नवे कोरे पुस्तके मिळाले नसतील,अर्ध्या - पाऊण किमतीची पुस्तके,अलटर केलेला पॅंट घातला असेल,पायात वीस रुपयांची स्लीपर घातली असेलपण तरीही त्या आयुष्याची मजा आजच्या मेट्रो,मोची च्या चप्पल बुटात नाही.

एकूण त्या काळात शाळेची मजा,शाळेच्या आठवणी आमची पिढी आज ग्रुपवरील वर्गमित्रांच्या आठवणी उगाळत आज देखील जगते आहे नव्हे तो आमच्या आयुष्याचा अनमोल ठेवा आहे.

आज काळ बदलला आहे.

क्लासेस संस्कृतीचा जन्म झाला आणि सुरुवातीला ११ वी १२ वीचे शिक्षण शाळेत नावापुरते नाव टाकून क्लास मध्ये शिक्षण घेण्याचे लोन आता चवथी पाचवी पर्यंत येऊन ठेपले आहे आणि हीच मोठी चिंतेची बाब झाली आहे.

आता ना कुठल्याही शाळेत विद्यार्थ्यांची किलबिल ऐकायला येत ना मुलं खेळ खेळतांना, दिसत ना बागडताना पहायला मिळत. संस्काराचे दान आपल्या पदरात टाकणारा शिक्षक विद्यार्थी नसलेल्या शाळेत शासनाचा पगार घेत आहे.आणि बेकार फिरणारा,पदवी असलेला-नसलेला क्लासेसवर तुटपुंज्या पगारावर मुलांना शिकवत आहे. पुणे,लातूर, नांदेड ला जाऊन शिकणारी मुलं कुठल्या तरी शाळेची विद्यार्थी आहेत.त्यांना केवळ परीक्षा देण्यासाठी त्या शाळेच्या परीक्षा केंद्रावर जाणे आहे. ना कधी त्यांनी त्या शाळेची घंटी ऐकली, ना कधी राष्ट्रगीत म्हटले,ना कधी स्वातंत्र्यदिन,प्रजासत्ताक दिनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला ना तिथल्या भिंती,माती शी त्याचा संवाद झाला. जीर्ण झालेल्या शाळेच्या इमारतीशी,तिथल्या विटा मातीशी,अजूनही सावली देत उभ्या असलेल्या शाळेच्या झाडांशी आमच्या पिढीचे नाते होते.कधी त्याच्या फांदीला लटकलो असेल,कधी त्या झाडाचा डिग घरी नेला असेल,गुरुजींचे लक्ष चुकवून त्यावर चढण्याचा प्रयत्न केला असेल अशा सजीव-निर्जीव वस्तुशी आमचं एक वेगळं नातं होतं.

बुलडाणा जिल्ह्यातील हिवरा आश्रम हे गाव तर नवोदय विद्यालयात निवड होऊन शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे दालन झाले आहे. हिवऱ्या सारख्या छोट्या गावात खोल्या भाड्याने मिळेनाशा झाल्या आहेत.दुसरी तिसरी मध्ये शिकणाऱ्या चिमुकल्या मुलाला गाव,बालमित्र सोडून आजी आजोबा किंवा आई वडील यांच्यासमवेत रहावे लागते आहे.पायाला घट्टे पडे पर्यंत नवोदय चाच अभ्यास घासून घासून त्याच्याकडून घाण्याच्या बैला सारखा करून घेतल्या जात आहे.बुद्धिमत्ता ,गणित आणि भाषा याच विषयांची घोकंनपट्टी केल्या जाते,परिणामी इतर विषयात त्या त्या मुलाचे ज्ञान शून्यात जमा आहे. मुलांना आपण घडवतो की बिघडवतो याकडे पालकांचे लक्ष नाही.



आपला मुलगा शिकावा, मोठ्या हुद्द्यावर जावा अस कुठल्याही पालकांना वाटणे साहजिकच आहे. आणीनते रास्त देखील आहे.परंतु तो माणूस व्हावा याकडे गंभीरतेने पालक बघत नसल्याने भविष्यात त्याच पालकांसमोर चुकीचे ताट वाढून जर आले तर वाईट वाटता कामा नये.

आज वेगवेगळ्या क्लासेस मध्ये ५ वी पासूनचे मुले क्लासेसच्या हॉस्टेल वर राहत आहेत.शाळेपेक्षा क्लासेच्या हॉस्टेल वरील विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.

शासनाचा पगार घेणारे शिक्षक शाळेत रिकामे बसून आहेत.रिकामे झालेले अर्थात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना शिक्षक योगी म्हणून मानधनावर शासनाने नियुक्त केले आहे.

एकूण भविष्यात सरकारी शाळा ह्या कायमस्वरूपी बंद करण्याची ही नांदी आहे आणि पालकवर्ग त्याला बळी पडत आहे.म्हातारी मेल्याचं दुःख नसते,काळ सोकावतो असे म्हणतात.

पूर्वी गावात काळी पिवळी,ऑटो आला आणि खेडेगावात येणारी एसटी बस आपणच बंद पाडली. क्षणिक फायद्यासाठी आपल्याच पायावर आपण दगड पाडून घेतला नेमके तेच भविष्यात आपल्या समोर वाढून येणार आहे.आणि ते स्वीकारण्या शिवाय दुसरा कुठलाही पर्याय आपल्याकडे असणार नाही.

ज्या राजकारण्यांना आपण निवडून देतो ते इकडून तिकडे अन तिकडून इकडे पळण्यात मश्गुल आहेत.समाजाचे वाटोळे करण्याचे धंदे सुरू असतांना लोकप्रतिनिधी असणारे हे नागड सत्य उघड्या डोळ्याने बघत आहेत. नव्हे स्वतःच्या संस्था चालल्या पाहिजे.एक संस्था काढली म्हणजे पुस्तकांचे दुकानदार, शाळेचे बूट विकणारे,सॉक्स,गणवेश,स्वेटर,कोट विकणारे कापड दुकानदार,स्कुल बस च्या नावाखाली विद्यार्थ्यांची मेंढरा सारखी वाहतूक करणारे ते स्वतःच झाले आहेत.शैक्षणिक दालना च्या नावाखाली हा सगळा व्यापार ,आणि किंमत देखील आपण म्हणू तीच,पुस्तके आमचीच,पायातील खेटरे,आमचीच,कापडं आमचीच असा एककल्ली धंदा ह्या लोकांनी उघडला आहे.विरोधक आपल्या राजकीय विरोधकाबद्दल काहीही बोलेल मात्र विद्यार्थ्यांची एका संस्थेच्या चालकाने शिष्यवृत्ती जरी घशात घातली,टीसी देण्याच्या नावाखाली पालकांची आर्थिक फसवणूक जरी केली आणि ही तक्रार घेऊन पालक आपापल्या नेत्याकडे जरी गेला तरीही यात राजकीय स्टेज वरून पातळी सोडून टीका करणारा मात्र त्याच्या या शैक्षणिक धंद्याच्या आड येत नाही,पण गावात भांडण तंटा झाला की पोलीस स्टेशन ला फोन लावायला मात्र तत्पर असतात.

परंतु शेवटी असेच म्हणावे लागणार की जशी वरमाय तसे वऱ्हाड लोकांना हे सगळं चालत असल्याने लोकांवर हे लादल्या जात आहे,परंतु येणाऱ्या काळात भावी पिढीला याचे खूप मोठे परिणाम भोगावे लागणार आहे. राजकीय शाळा भरविण्यामुळे भावी पिढी शाळेला कायमची मुकणार हे तितकेच खरे !

# मारहाणीच्या गुन्ह्यातील ३ आरोपी दोषी; ३ वर्ष कैदेची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पोलीस स्टेशन पैठण येथे दिनांक २४/०४/२०१७ रोजी फिर्यादी शिवाजी कचरु गिरगे , वय ३२ वर्ष , व्यवसाय शेती , रा . मायगाव , ता . पैठण यांनी फिर्याद दिली होती की , यातील आरोपी १ ) विठ्ठल सखाराम गिरगे , २ ) सुदर्शन सखाराम गिरगे , ३ ) सुरेश विठ्ठल गिरगे , ४ ) छाया विठ्ठल गिरगे सर्व रा . मायगाव , ता . पैठण यासवांनी संगणमत करुन दिनांक २३/०४/२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०५.३० वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर येवुन संगणमत करुन शेताचा बांध का मोडला असे म्हणुन कारणावरुन शिवीगाळ करुन मारहाण मारुन जखमी करुन जिवे मारण्याची धमकी दिली वगैरे फिर्याद दिले वरुन आरोतांविरुद्ध कलम ३२६ , ३२४ , ३२३ , ५०४ , ५०६ , ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करुन सदर गुन्हयाचा तपासपुर्ण करुन आरोपीतांविरुद्ध मा . प्रथमवर्ग न्यायालय पैठण येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते . दिनांक ०६ / ० ९ / २०२४ रोजी मा . प्रथमवर्ग न्यायालय पैठण श्रीमती ए.सी. रोकडे मॅडम यांनी आर . सी . सी . क्रमांक ३१३/२०१७ अन्वये खटल्याचा अंतिम निकाल देत आरोपी १ ) सुदर्शन सखाराम गिरगे , २ ) विठ्ठल सखाराम गिरगे , ३ ) छाया विठ्ठल गिरगे सर्व रा . मायगाव , ता . पैठण यांना कलम ३२६ , ३२४ , ३२३ , ३४ नुसार दोषी ठरवुन ०३ वर्षाची कैद आणि ५००० / - रुपय दंड तसेच दंड भरण्यास कसुर केल्यास ०३ महिने कैद अशी शिक्षा सुनावली आहे . सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार श्री . राजु जावळे यांनी पुर्ण करुन दोषारोपपत्र दाखल केले होते तर सरकारी वकील श्री . अनिल शिंपी यांनी खटल्याचे न्यायालयीन कामकाज पाहुन मा . न्यायालयासमक्ष सरकारपक्षाची बाजु मांडली असुन सदर खटल्याचे न्यायालयीन कामकाज चालु असताना मा . श्री . मनिष कलवानिया , अपर पोलीस अधीक्षक श्री . सुनिल लांजेवार , उपविभागीय पोलीस अधिकारी पैठण श्री . सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन पैठणच्यावतीने पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या सुचनांप्रमाणे कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस कॉन्स्टेबल मुकुंद नाईक यांनी काम पाहिले आहे .

# महाराष्ट्राची रणरागिणी पुरस्काराने जयश्री बागुल सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील सवंदगाव या खेडेगावातील रहिवासी समाजसेविका सौ जयश्रीताई बागुल यांना रविवार दि. 7 रोजी मलकापूर येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राची रणरागिणी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बुलढाणा येथील माणुसकी मल्टिपर्पज फाऊंडेशनतर्फे हा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मलकापूर जनता कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.चव्हाण, प्रमुख अतिथी मलकापूर शहर पोलिस स्टेशनच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक स्मिता म्हासाबे यांच्या हस्ते जयश्री बागुल यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी ओम शांती सेवा समिती अध्यक्ष सचिन भन्साळी यांची उपस्थिती होती.विवेक राजापूरे यांच्या अध्यक्षते खाली हा पुरस्कार सोहळा पार पडला. संभाजीनगर मधील वेगवेगळ्या भागातून जयश्री वसंत बागुल यांचे अभिनंदन केले जात आहे.



# अंगणवाडी सेविका-मदतनीस संप : बालके, स्तनदा मातांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे गत ०४ डिसेंबरपासून विविध मागण्यांसाठी बेमुदत आंदोलन सुरू असुण महिना उलटला मात्र यावर काहीच तोडगा निघत नसल्याने बालके स्तनदामाता कुपोषित बालके यांचे पोषण आहार विना हाल सुरु असल्याचे चित्र आहे तर कुपोषित बालकांत वाढ होतानाचे चित्र आहे.

खुलताबाद तालुक्यात मोठ्या अंगणवाड्या १०८ तर मिनी ( छोट्या ) अंगणवाडी ६५दरम्यान आहे आणि तेवढेच सेविका मदतनीस आहे.यापैकी ३१दरम्यांन अंगणवाड्या आंदोलनात सहभागी झाले नाही.अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी गत



०४डिसेंबर पासून विविध मागण्यांसाठी बेमुदत आंदोलन पुकरले आहे.व ठिकठिकाणी संबंधित कार्यालयात मागण्यांचे निवेदन देवून पगारात वाढ, ग्रॅच्युइटी, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, पेन्शन योजना, टीए बील, इंधन बिल,सीबीई चे पैसे, सिमकार्ड रिचार्ज तातडीने बील आदि मागण्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी केलेली आहे. परंतु शासन यांकडे दुर्लक्ष करत असल्याने आंदोलन दिवसांदिवस लांबणीवर जात आहे.सेविका व मदतनीस यांच्या मागण्या रास्त असले तरी अधिक ताणून धरल्याने गरोदर माता, स्तनदामाता, किशोरी मुली,बालके प्रकृती देखरेख शुन्य ते सहा वयोगटातील बालके वजन उंची सुधरना पोषण आहार वाटप आदि सर्व सेवा ठप्प असल्याने सध्या हाल सुरु आहे.व यांकडे स्पेशल पाठ फिरवण्यात आली आहे.तर सरकार प्रशासन काहीच तोडगा- तडजोड करत नसल्याने या सर्व सेवेवरच प्रश्न चिन्ह उभे राहिले आहे.

# धर्माबादमध्ये भाजपा, शिंदे गटाला अजित पवार गटाचा दे धक्का !

## शहराध्यक्षपदी नरेश रेड्डी, तालुका कार्याध्यक्ष नारायण पा.पवार, सरचिटणीसपदी सतिष पा. शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील शिंदे गट व भाजपला खिंडार पाडत अजित पवार गटाने अनेक युवा चेहरे आपल्या गळाला लावले आहेत.विनायकराव कुलकर्णीच्या निधनानंतर अजित पवार गटाचे काय होईल? यावर अनेक तर्क - वितर्क लावले जात असतानाच हम अभी बाकी है तालुक्यातील भविष्य यामुळे अनेक चर्चांना उधान आले आहे. यांच्या गटात जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर प्रवेश करण्यात आले. आमदार गटावर व शिंदे या दोन गटामध्ये सुद्धा नाराज पद अधिकारी पक्ष प्रवेश करण्यात आले, धर्माबाद तालुक्यातील भाजपा सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष नारायण पाटील पवार हे भाजपा चे एक निष्ठ असलेले आज राष्ट्रवादी मध्ये जाण्याची वेळ भाजपा वर नाराजीगी दाखवत राष्ट्रवादी मध्ये पक्ष प्रवेश करण्यात आले,भाजपा च्या विरोधकांना सडेतोड उत्तर सोशल मीडियावर देणारे असे पद अधिकारी पक्ष सोडन्याचे कारण काय? लोकसभा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपा व शिंदे गटाला स्थानिक स्वराज्य निवडणूक मध्ये याचे परिणाम होतील का? रत्नाळी चे भूमी पुत्र विधानसभेच्या निवडणुकीत एक निष्टने काम करणारे नरेश रेड्डी अस्या कार्यकर्तेना भाजपा सोडण्याचे कारण काय.? याचे परिणाम आमदार गटाला होणार काय? आमदार गटाला येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये भाजपा,आमदार गटाला धक्का बसेल का?शिवसेना शिंदे गटाचे तालुका अध्यक्ष पदाच्या पदावर इच्छुक असेलेले सतिश पाटील शिंदे हे शिवसेला धक्का देत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये पक्ष प्रवेश केले आहे.माजी आमदार बालाजी कल्याणकर,आकाश रेड्डी यांचे विश्वासू मानले जाणारे सतिश पा. शिंदे हे राष्ट्रवादी मध्ये पक्ष प्रवेश केले आहे. शिवसेना शिंदे गट आत्म परीक्षण करणार का? येणाऱ्या जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा, येणाऱ्या



निवडणुकीत शिवसेनाला फटका बसणार काय? शिवसेना शिंदे गटाचे माजी तालुका प्रभारी सतिष पाटिल शिंदे, भाजपा सोषल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष नारायण पाटील पवार, रत्नाळी येथील भाजपचे नरेश रेडी या सर्वांनी आपल्या शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांच्या गटात जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकाध्यक्ष दीपक पाटील कदम , जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव धर्माधिकारी,युवक जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील, युवकचे विधानसभा अध्यक्ष नागेंद्र पाटिल कदम, किरण पाटील बेंद्रे, युनूस खान, कृष्णा मुळी, बिरपा मदनुरकर आदी जणांच्या उपस्थीतीत जाहीर प्रवेश केला आहे. जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख धर्माधिकारी यांनी शहर अध्यक्ष पदी नरेश रेडी, तालुका कार्याध्यक्ष पदी नारायण पाटील पवार, तालुका सरचिटणीस पदी सतिष पाटिल शिंदे, युवक शहर अध्यक्ष पदी शमू भाई यांची निवड करून सदरील निवडीचे पत्र दिले आहे. पक्षाचे तालुक्यात संघटन वाढवण्यासाठी तालुकाध्यक्ष दीपक पाटील चोळखेकर हे प्रत्येकाशी संपर्क साधत आहेत. येणाऱ्या काळात अनेकांचा पक्षप्रवेश होणार असून तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बळकट करू असा विश्वास यावेळी तालुकाध्यक्ष दीपक पाटील चोळाखेकर यांनी व्यक्त केला आहे.



# नैताळेच्या श्री मतोबा महाराज देवस्थान ट्रस्ट अध्यक्षपदी नामदेव बोरगुडे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक - छत्रपती संभाजीनगर या महामार्गावर असलेल्या व संपुर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या नैताळे ता.निफाड येथील श्री.मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी नामदेव भिकाजी बोरगुडे यांची निवड झाली आहे.

पौष महिन्यातील पौर्णिमेला मतोबा महाराज यात्रोत्सव सुरू होऊन तो तब्बल १५ दिवस चालतो. याकाळात महाराष्ट्रातील सुमारे २० लाख भाविक दर्शन घेत असतात. श्री. मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टची २००९ मध्ये धर्मदाय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे अधिकृत नोंदणी झाली आहे. त्यानंतर देवस्थान व परिसराचा झपाट्याने विकास झाला आहे. नोंदणी नंतर दुसऱ्यांदा कार्यकारिणीत बदल होत असून नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्ष प्रशांत धरमचंद ओस्तवाल, सचिव नंदू रेवजी बोरगुडे, खजिनदार केदू पर्वत बोरगुडे, सहसचिव राजेंद्र वसंत बोरगुडे, विश्वस्त - अण्णासाहेब गणपत बोरगुडे, निवृत्ती रेवजी बोरगुडे, भागवत मुरलीधर घायाळ, सोपान मुरलीधर बोरगुडे, रामदास काशिनाथ भवर, शांताराम निवृत्ती बोरगुडे, अरुण संपत बोरगुडे, केशव संपत बोरगुडे, मधुकर भिकाजी जेऊघाले, विठ्ठल नरहरी कोटकर, नवनाथ रामकृष्ण बोरगुडे, राजेंद्र रामनाथ बोरगुडे, हरी भागवत बोरगुडे, खंडू भागवत बोरगुडे यांचा समावेश करण्यात आला आहे.

मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी माझी वर्णी लागली आहे हे माझे भाग्य समजतो . माझ्या कार्यकाळात सर्व विश्वस्त मंडळाला विश्वासात घेऊन कामकाज केले जाईल, यात्रोत्सव काळात भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.
**नामदेव बोरगुडे, अध्यक्ष, श्री .मतोबा महाराज देवस्थान ट्रस्ट**

# चिनी आणि नायलॉन मांजा विक्री केल्यास कठोर कार्यवाही : स.पो.नि. राहुल वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** पक्षी, प्राण्यांसह मनुष्याच्या जीवाला धोकादायक ठरणाऱ्या चिनी आणि नायलॉन माजांच्या विक्रीला राज्य सरकारने बंदी घातली आहे. ही बंदी झुगारून नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक किंवा वापर करताना आढळल्यास पोलिस कारवाईला सामोरे जावे लागेल. बंदी आदेश न पाळल्याबद्दल गुन्हा दाखल होऊन तुरुंगवासही होऊ शकतो असा इशारा लासलगाव पोलिस ठाण्याचे स.पो.नि.राहुल वाघ यांनी दिला आहे. मकरसंक्रांतीच्या आधीच पतंगबाजी सुरू होते. ही पतंगबाजी महिनाभर सुरू असते. पतंगबाजी करताना काटाकाटीच्या स्पर्धेत चिनी आणि नायलॉन मांजाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे पतंग प्रेमीं बरोबरच रस्त्यावर चालतानाही जीव मुठीत घेऊन फिरावे लागते. या धोकादायक मांजामुळे या कालावधीत अनेक नागरिक, पक्षी, प्राणी जखमी होतात, तर काही मृत्यूमुखी पडतात. त्यामुळे या मांजावर बंदी घालण्याची सूचना न्यायालयाने सरकारला केली आहे. मांजाची विक्री व वापरावर बंदी घातली तरीही या मांजाची विक्री आणि वापर सर्रास सुरू आहे. अशा विक्रेत्यांवर आणि मांजा वापरणाऱ्या पतंग प्रेमींवर कारवाई करण्यासाठी लासलगाव पोलिसांनी कंबर कसली आहे. लासलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दुकानांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत तसेच आपल्या आजूबाजूला नायलॉन मांजाची विक्री किंवा वापर करताना कुणी आढळल्यास त्याबाबत कळवण्याचे आवाहन लासलगाव पोलिसांनी केले आहे.



नायलॉन किंवा चिनी मांजा वापरताना अगर विक्री करताना कुणी आढळल्यास बंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कलम १८८ अंतर्गत गुन्हा दाखल होईल . हा जामीनपात्र गुन्हा असला, तरी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे एक महिना कारावास किंवा दंड तसेच दोन्ही शिक्षा होऊ शकतात . या मांजामुळे कुणी जखमी झाल्यास भादंविच्या इतर कलमांनुसारही कारवाई केली जाऊ शकते . – **स .पो .नि .राहुल वाघ**



# कापूस पणन महासंघ निवडणूकीत प्रसेनजीत पाटील यांचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ २०२३-२४, मुंबई निवडणूक ७ जानेवारी २०२४ रोजी पार पडली. अटीतटीच्या मंत्री गिरीश महाजन यांचे विश्वासू जामनेर भाजपा तालुकाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर यांचा ३४ मतांनी पराभव करत या निवडणुकीत बाजी मारली.

या निवडणुकीत प्रतिस्पर्धी असलेले 17 संचालक असलेल्या पणन महासंघाच्या मंडळामध्ये 13 लोक अविरोध निवडून आले होते. खामगाव झोन मधून गेली 3 टर्म संचालक असलेले प्रसेनजीत पाटिल यांनी माजी आमदार धृपतराव सावळे यांच्यासाठी माघार घेऊन त्यांना या झोन मधून अविरोध दिले. संपूर्ण राज्यातून असलेल्या ईतर मागासवर्गीय (ओबीसी ) मतदारसंघातून निवडणूकीला सामोरे जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांच्या विरोधात मंत्री गिरीष महाजन यांचे निकटवर्तीय तथा जामनेर भाजपा तालुकाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कार व अजित पवार गटाचे उदगीर (लातुर ) येथील भरत चामले हे प्रतिस्पर्धी उमेदवार होते. मंत्री गिरीष महाजन यांनी राज्यभर असलेली संघटनेची, सत्तेची ताकद व मतदान तारखेच्या आधी भरत चामले यांनी बाविस्कार यांना दिलेला पाठींबा यामुळे ही निवडणूक अटीतटीची होईल अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती.

७ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या निवडणूकीत ११ झोन आणि २३जिल्ह्यातून २०७ मतदारां पैकी १८४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.आज ९ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या मतमोजणीत प्रसेनजीत पाटिल यांना १०९ मते , चंद्रकांत बाविस्कार यांना ७५ मते, भरत चामले यांना 0 मते मिळाली. प्रसेनजीत पाटिल यांनी गिरीष महाजन यांचे निकटवर्तीय चंद्रकांत बाविस्कार यांचा 34 मतांनी दणदनीत पराभव करीत विजय संपदान केला. विजयानंतर त्यांनी जयंतराव पाटिल, अशोकराव चव्हाण, विजयजी वड्डेटीवार,अनिलबाबू देशमुख, ,एकनाथरावजी खडसे,यशोमतीताई ठाकुर,राजेशभैय्या टोपे, प्रतापरावजी जाधव, डॉ. राजेंद्रजी शिंगणे,सुनिलभाऊ केदार, सुरेशराव वरपुडकर, कुणालबाबा पाटिल, सुभाषभाऊ धोटे, अशोकराव पवार, हर्षवर्धन (भैय्यासाहेब) देशमुख, संतोषदादा कोरपे,सुभाषराव ठाकरे, रमेशभाऊ बंग, सुरेशभाऊ देशमुख, संजय देशमुख, धृपतराव सावळे, प्रफुलभाऊ मानकर, प्रविणभाऊ मानकर, अनंतराव देशमुख, शिरीषभाऊ धोत्रे, वसंतराव घुईखेडकर, माणिकराव शिंदे तथा शेतकरी सहकार आघाडीच्या सर्व संचालक मंडळाचे आभार व्यक्त केले. विजयानंतर नागपूर आणि जळगाव जामोद येथे फटाके फोडून विजयी जल्लोष साजरा करण्यात आला.

# छत्रपती शाहू विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालय तसेच राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल वैजापूर या ठिकाणी नुकताच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न झाला.
विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच सुप्त कलागुणांना वाव मिळावा, विद्यार्थ्यांत संघ भावना वाढीस लागून आयुष्य सुंदर जगता यावं व आयुष्यातील संघर्षमय वातावरणात घेतलेला आंनद अनुभव पूरक ठरून विद्यार्थी विकास व्हावा असा हेतू ठेवत विद्यार्थ्यांच्या नृत्य कलाकृतीसह हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अध्यक्ष स्थान मुख्याध्यापक एस एन सय्यद यांनी भूषवले तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे विषय तज्ञ रमेश बागुल,मुख्याध्यापक डी बि भुजाडे,प्राचार्य विष्णू भिंगारदेव, प्राचार्य उत्तम सानप,मेजर चंद्रकांत त्रिभुवन, रिपाई चे बाळासाहेब त्रिभुवन, वंचितचे प्रवीण शिंदे,शिक्षक राजेंद्र केदार, मंगेश भागवत यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक एस एन सय्यद,शिक्षक एम के जाधव, शिक्षिका वाय एम काझी,एस डब्लू देशमुख, वाय डी राजपूत,शिक्षक यू एस भारती,शिक्षिका ए ए सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले असून यावेळी प्राध्यापक गणेश ठोंबरे, प्रशांत गायकवाड, रावसाहेब जाधव, महेंद्र पठारे, संगीता काळे, नावेद शेख, प्रतीक्षा टिळेकर आदी शिक्षक शिक्षिका, कर्मचारी विद्यार्थी पालक आदींची उपस्थिती होती. यात विद्यार्थ्यांच्या नृत्याने रंगत आली.



# राज्य बालनाट्य स्पर्धेत हरिदास घुंगासे लिखित आणि डॉ. सिद्धार्थ तायडे दिग्दर्शित 'अंकुर मानवतेचा' बालनाट्याचे दमदार सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित २० वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर येथील तापडिया नाट्यमंदिरात अंकुर मानवतेचा प्रयोग संपन्न झाला. 'अंकुर मानवतेचा' या बालनाट्यातील आशय सामाजिक दरी आणि आर्थिक विषमतेवर भाष्य करणारा आहे. लेखक हरिदास घुंगासे यांनी हा संवेदनशील विषय आपल्या बालनाट्यातुन मांडला आहे.सर्जनशील दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी दिग्दर्शन केले आहे. अंकुर मानवतेचा बालनाट्यात 'निल्या' हे पात्र येथील अराजक व्यवस्थेचे अपत्य आहे. इंडिया आणि भारत या भीषण अवस्थेत निरागस, अनाथ मुले आपले जीवन कसे व्यतिथ करतात याचे नाट्यमय दर्शन घडविण्याचा प्रयोग प्रयत्न दिग्दर्शक सिद्धार्थ तायडे यांनी केला. "अंकुर मानवतेचा" या बालनाट्यात ग्रामीण भागातील बालकलावंतांनी भूमिका साकारल्या आहेत. या प्रयोगासाठी निर्मिती सहाय्य रघु ताठे,



नंदू वाघमारे,किसन भोईटे, महेंद्र वाहुळे, जयराम बरडे,किशोर साबळे यांनी केले .हा नाट्यप्रयोग सुंदरेश्वर बहु. उद्देशीय से. संस्था,(गुंज )द्वारा आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पिंपळगाव(कुं),घनसावंगी,जिल्हा जालना येथील बालकलावंत सादर करीत आहेत. आयुष अकॅडमीचे संचालक लेखक हरिदास घुंगासे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत लेखन केले आहे. प्रस्तुत बालनाट्यामध्ये अमृता देवकर, एकता गणकवार,आराध्या तौर, कैवल्य कंटूले, , संचित बनसोडे, विराज दायमा ,करण पवार, ईश्वरी ताठे, गौरव डहाळे,अथर्व गुरव,आयुष घुंगासे, युवराज भोईटे,,ईश्वरी गुंजकर, सोनाक्षी लाड,शिवराजसिंह राजपूत आदी बालकलावंतांनी प्रेक्षकांची मने जिंकली. अंकुर मानवतेचा बालनाट्यास प्रसिद्ध नाटककार आसेफ अन्सारी शेख ,विख्यात सिने लेखक दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर लोया,प्रा. कन्नूलाल विठोरे,किशोर मोरे,प्रकाश घेणे, अभय गुजर यांचेसह स्पर्धा समन्वयक रूपेश परतवाघ यांचे विशेष सहकार्य लाभले. आजही गरीब शिक्षणा पासून वंचित राहतात. त्यांना कोणताही आधार नसतो मग अशा मुलांच्या शिक्षणासाठी व उदरनिर्वाहासाठी दानपेटीतील रक्कम, चैन मौज खर्च कमी करून तोच पैसा गरजवंतासाठी उपयोगात आणला पाहिजे. हे सामाजिक भान लहान मुलांना यावे यासाठी हा प्रयत्न केला आहे.मानवतेचा अंकुर रुजविण्यासाठी एक पाऊल उचलूया असा सामाजिक संदेश प्रस्तुत बालनाट्यातुन दिला आहे.

## प्रितम स्पोर्ट्स कडापे आयोजित क्रिकेट स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** प्रितम स्पोर्ट्स कडापे च्या रोप्यमहोत्सव वर्षा निमित्ताने भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन प्रितम स्पोर्ट्स कडापे च्या वतीने उरण तालुक्यातील कडापे गावात करण्यात आले होते .क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन संतोष रघुनाथ थळी, मनसे उरण पूर्व विभाग अध्यक्ष अनिल गावंड ,सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे ,आदर्श शिक्षक अशोक महादेव म्हात्रे यांच्या शुभ हस्ते झाले.तर या क्रिकेट स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस तालुका अध्यक्ष उरण विनोद म्हात्रे , मनसे उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत, धनेश गावंड,मिलिंद शामकांत गावंड,विनोद साळवी गट प्रमुख कॉटन ग्रीन शिवसेना उबाठा, सुनील म्हात्रे मनोज गावंड माजी उपसरपंच आवरे, प्रितम स्पोर्ट्स कडापे संघाच्या माझी कर्णधार व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.



## उमरी नगर परिषदेत पत्रकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिन उमरी नगर परिषदेत साजरा करण्यात येणार आला. या निमित्त शहरातील व तालुक्यातील पत्रकार बांधवांचा मुख्यधिकारी श्रीमती निलम कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शहरातील व तालुक्यातील पत्रकारांची उपस्थिती होती.



## भदाणे यांच्यातर्फे दिनदर्शिकेचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नेर :** इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान तर्फे दैनंदिन दिनदर्शिकेचे (कॅलेंडर) २०२४ मोफत वाटप करण्यात येत आहे.दैनंदिन माहिती, सण,उत्सव,तिथी महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी इत्यादी सर्व महत्वपूर्ण नोंदींची सविस्तर माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशातून या दिनदर्शिकेचे वितरण धुळे ग्रामीण मधील सर्व गावांनमध्ये घरोघरी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब भदाणे व सचिव सौ.शालिनीताई भदाणे यांच्या माध्यमातुन केले जात आहे

## अवघ्या २४ तासांत आरोपीस अटक

### एल.ई.डी. टि.व्ही. शिलाई मशिन, पाण्याची मोटार जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नेर :** दोंडाईचा येथे दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ८ वाजेपासुन ते दिनांक - १ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९ वाजेपावेतो फिर्यादी वसीन ऐनुद्दीन खाटीक, वय ३३ वर्ष, व्यवसाय रिकामे बारदान खरेदी- विक्री, रा. गरीब नवाज कॉलनी दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे यांचे भाऊ आशिक ऐनुद्दीन खाटीक हे घरी नसतांना घरातुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने एल.ई.डी. टि.व्ही. शिलाई मशिन, पाण्याची मोटार चोरी केल्याने दोंडाईचा पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने दोंडाईचा पोलीस स्टेशनला गुरनं - ०९/२०२४ भादंवि क. ३८०,४५४,४५७ प्रमाणे दिनांक ०६/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर घटनेचे गांभिर्य लक्षात घेवुन दोंडाईचा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्रीराम पवार, पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्नाखाली शोध पथकात नेमणुकीस असलेले पोलीस उप-निरीक्षक, पी.पी सोनवणे, पोहेकॉ सुनिल रतीलाल महाजन, पोकॉ पी.व्ही. पवार, पोकॉ हिरालाल वना सुर्यवंशी, पोकॉ अनिल दादाभाई धनगर, पोकों गावीत यांचे पथकास अज्ञात चोराचा शोध घेण्याबाबत आदेशीत केल्याने पोलीस पथकाने दोंडाईचा शहरात गुप्त बातमीदारामार्फत माहीती काढुन आरोपी रोहीदास छगन कोळी, वय २२ वर्ष, रा. चैनी रोडी, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. यास अटक करण्यात यश आले त्याचेकडुन चोरी केलेला मुद्देमाल हस्तगत केला. त्यात १० हजार रुपये किंमतीचा एम.आ कंपनीचा ३२ इंची एल.ई.डी. टी.व्ही, ५ हजार रुपये किंमतीची अर्धा इंच हॉर्सपॉवरची ओरीएन्ट कंपनीची पोपटी रंगाची पाण्याची चालु स्थीतीत असलेली मोटार, ५ हजर रुपये किंमतीचे पैंथर कंपनीचे सिलाई मशीन चालु स्थीतीत असलेले, पत्रटी डब्यात १ हजार रुपयाची चिल्लर आणि त्या डब्यात ठेवलेले भाउ आशिक याचे लॅमिनेशन केलेले आधारकार्ड ,५००/- रुपये किंमतीचे हेअर स्टेटनर मशीन असा ऐकून २१,५००/- रुपये मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पी.पी. सोनवणे, नेम - दोंडाईचा स्टेशन हे करीत आहेत. सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, मा. अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांचे मार्गदर्शनाखाली दोंडाईचा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, पोलीस उप-निरीक्षक, पी.पी. सोनवणे, पोहेकॉ सुनिल रतीलाल महाजन, पोकॉ पी.व्ही. पवार, पोका हिरालाल वना सुर्यवंशी, पोकॉ अनिल दादाभाई धनगर, गावीत यांनी केली आहे.






## आयडीए बुलढाणा शाखेतर्फे पत्रकारांची दंतचिकित्सा, स्वच्छ मुख अभियान संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा : आयडीए** बुलढाणा शाखे मार्फत पत्रकार दिनानिमित्त पत्रकार बंन्धू यांची दंतचिकित्या स्वच्छ मुख अभियान संपन्न शाखे अंतर्गत दिनांक सहा जानेवारीला बुलढाणा येथील पत्रकार भवन मध्ये पत्रकार दिनानिमित्त पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आय डी ए बुलढाणा तर्फे दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आलेया दंत शिबिरामध्ये पन्नास वर रुग्णांची तपासणी करून त्यांना औषध वाटप करण्यात आले चांगल्या मौखिक आरोग्याचे महत्त्व विशद करण्यात आले या कार्यक्रमाला बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजय गायकवाड यांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले.आणि पत्रकार दिनानिमित्त थोडक्यात माहिती सांगितली. शिबिरामध्ये खालील डॉक्टरांनी दंत तपासणी करून मोलाचे योगदान दिले इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेचे अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे ,सेक्रेटरी डॉक्टर सचिन किनगे ,डॉक्टर निर्मला सुरोशे ,डॉक्टर अंशुमन जयस्वाल ,डॉक्टर नितीन वाघ, डॉक्टर साकेत सदावर्ते ,डॉक्टर गीतिका सदावर्ते,डॉक्टर संजय गवळी ,डॉक्टर वृषाली गवळी , डॉक्टर निलेश जुमडे व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संकटांवर स्वार व्हायला शिका : दशरथ ननावरे

आधुनिक केसरी न्यूज

सुशिल गायकवाड

**लोणंद :** छत्रपती शिवाजी महाराजांनी नियोजनाच्या बळावर स्वराज्य उभे केले. संकटातून मार्ग काढण्यासाठी योजना आखल्या त्यामुळे यश मिळाले. कोणत्याही कामाचे योग्य नियोजन तुम्हाला यशाच्या शिखरावर घेऊन जाते.शालेय वयात अभ्यासातील सातत्य ठेवून प्रत्येक विषयाच्या मूळाशी पोहचून आकलनपूर्वक अभ्यास केला तर अपयशाला सामोरे जावे लागणार नाही. जीवनात यश प्राप्त करण्यासाठी योग्य नियोजन व कामाची वेळेत सुरुवात करायला हवी. जीवनात संकट ही कधीच अडवायला येत नाहीत तर ती आपणाला घडवायला येतात. संकट कितीही मोठे असूद्या मनातील भीती बाजूला सारून संकटांवर स्वार व्हायला शिका.असे प्रतिपादन वक्ते इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांनी केैले.खंडाळा येथील राजेंद्र विद्यालयात भव्य व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना 'इतिहास आणि शिक्षण प्रेरणा' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.यावेळी मुख्याध्यापक नंदकुमार मापारी,श्रीकांत घाटे, स्मिता गाढवे,अमृता राव यासह प्रमुख उपस्थित होते. दशरथ ननावरे पुढे म्हणाले की,पुढे जाण्यासाठी संकटांना संधी मानून काम केले तर तुम्ही यशाच्या शिखरावर निश्चित पोहचाल. आपल्यातील कमतरतांचे कारण पुढे करून अडून बसू नका.त्यांना बलस्थाने बनवा.तुमचा यशाचा मार्ग मोकळा होईल.तुमच्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही.असे ही त्यांनी म्हटले.मुलांनी विद्यार्थी दशेतच ध्येय निश्चित केले पाहिजे.आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उत्तुंग ध्येय समोर ठेवले पाहिजे.जिद्द,चिकाटी आणि प्रयत्नातील सातत्य कायम ठेवून त्या ध्येयाचा पाठलाग करायला हवा.जीवनात हमखास यश मिळवायचे असेल तर आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा.असा प्रयत्नवादी बनण्याची प्रेरणादायी संदेश दशरथ ननावरे यांनी त्यांच्या मनोगतातून दिला.

# खुलताबाद शहरात विविध विकास कामांसाठी दोन कोटींचा निधी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या 'वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत' मी खुलताबाद शहरातील विविध विकास कामांसाठी 2 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून रविवारी सदरील कामाचे भूमिपूजन केले. यामध्ये गुलमंडी चौक ते ठाकरे चौक सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करण्यासाठी 79,99,678, ठाकरे चौक ते विकी सोनवणे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करण्यासाठी 29,99,868, दिनेश सावजी यांचे घर ते सतीश कोळी यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करण्यासाठी 29,99,868, हाफिज मेडिकलवाले ते सुधाकर भाऊ यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करण्यासाठी 29,99,863, चिस्तीय कॉलेज ते आयडील शाळेपर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करण्यासाठी 29,99,218 आदी कामांचा समावेश आहे याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष श्री.अनिल चव्हाण, माजी सभापती श्री.महेश उबाळे, शहराध्यक्ष श्री.गजानन फुलारे, युवकचे तालुकाध्यक्ष श्री. विनोद जाधव, श्री. ज्ञानेश्वर दुधारे, श्री.रावसाहेब फुलारे, श्री.ज्ञानेश्वर मातकर, श्री.भगवान कामठे, श्री.मुजिबोद्दीन, श्री.आदीब शेख, श्री.अरुण तंबारे, श्री.मिठू महालकर, श्री. केशव जाधव, श्री.इब्राहिम शहा, श्री.गणेश लाळे, श्री. भाऊसाहेब पवार, श्री.मुजाईद कुरेशी, श्री.मुरलीधर पवार, श्री.राजु गायकवाड, श्री.सुजित वाकळे, श्री.रुशी बळी, श्री.गजानन बारगळ, श्री.सागर तुपे श्री.अमोल तुपे, श्री. राहुल जगताप, श्री.बालु हजारे, श्री.सोमीनाथ अंभोरे, श्री. अशय बारगळ, श्री.रविंद्र फुलारे, श्री.नागेश कायस्थ, श्री. बंडू जोशी, श्री.अब्दुल अजीज, श्री.सोहेल कुरेशी आदींसह शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शहराच्या विकासाठी 2 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विविध ठिकाणी खुलताबाद येथील नागरिकांनी आमदारांचे स्वागत अभिनंदन केले.



# बाबुळगाव हल्ला; अमोल साबळे यांचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** बौध्द समाजाच्या कार्यकर्त्यांवर सोलापूर जिल्हातील बाबुळगाव येथे हल्ला करण्यात आला. याप्रकरणी महाराष्ट्रातून आंबेडकरी जनतेकडून निवेदने देत निषेध व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे. म्हणून आंबेडकरी समाजाकडुन मागणी होऊ लागली आहे. बौद्ध समाजातील कार्यकर्त्यांवर करण्यात आलेल्या हल्ल्याप्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)) पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी सुद्धा निषेध व्यक्त करणारे निवेदन पुरंदरचे तहसीलदार यांना दिलेले आहे. सदर कुटूंबाला पोलिस संरक्षण मिळावे अशी अपेक्षा अमोल साबळे यांनी व्यक्त केली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,सोलापूर जिल्हयातील बाबुळगाव येथे जातीयवादयांचा बौध्द समाजाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाला असुन बाबुळगाव जातीवादी बौध्द समाजावर हल्ला कारणास्तव राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोगान या घटनेबाबत सुचना दिलेल्या आहे.जिल्हा अधिकारी काय करत आहे? पोलीस काय करतायेत यांनी या घटनेला भेट दिली पाहिजे.कायदयानुसार कलेक्टर व एस.पी. यांनी २४ तासांच्या आत आले नाही तर कायदयाची काय ताकद आहे हे आम्ही यांना दाखवून देऊ.या कुंटुंबातील जे जखमी आहेत. हया हल्ल्यातील एक आरोपी अटक आहे, तर दोन आरोपी ताब्यात घेतलेले आहेत.हे दोघे ताब्यात असलेले आरोपी अल्पवयीन आहेत. त्यांना अटक दाखवलेले नाही. राहिलेले जे तीन आरोपी आहेत. त्यामध्ये एक प्रत्यक्षात असलेला व दोन संघमत केले असून ते फरार असून जो पर्यंत त्यांना अटक होत नाही.यांच्यावरती कठोर कारवाई करण्यात यावी.कार्यकत्यावर हल्ला झाला.त्यावेळेस कलम ३०२ (१२०ब) नुसार चॉपर, गज, इ हत्यार कुठुन आणले? आणण्यासाठी कोणी मदत केली? कोणी पैशाची मदत केली होती? कोणी पळुन लावण्याची मदत केली आहे का? गुन्हा करताना कट कुठे केला? यासंदर्भात सर्व तपास होणे आवश्यक आहे.जर असे झाले नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे पुणे जिल्हा उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी दिला आहे. या घटनेच्या निषेधार्थ रिपाई (आंबेडकर) व अनेक आंबेडकरी संघटना निषेध व्यक्त करत आहे.



# कळंब यशवंत सेनेच्या वतीने फळे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथील संत ज्ञानेश्वर महाराज शाळेत महाराजा यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेक सोहळा दिन साजरा. कळंब तालुक्यातील संत ज्ञानेश्वर महाराज मुकबधीर शाळेत महाराजा यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेक सोहळा दिन व यशवंत सेनेचे अध्यक्ष बाळासाहेब दोडतले यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.दादाराव गुंडरे होते तर दीपक हारकर , सूभाष मैंदाड,दिंगबर कस्पटे, संतोष घाटुळे, दत्तात्रय गायके, संभाजी हारकर, सचिन हारकर, दिगंबर हारकर, बाळासाहेब दुगाने,अक्षय शेंडगे अमोल मैदाड,करण गायके,यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी प्रा.गुंडरे सर यांनी मल्हारराव होळकर यांच्या जीवनातील काही आठवणी सांगुन उपस्थितांना त्यांच्या कार्याची माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजित गायके, सुत्रसंचलन डॉ.अशोक शिंपले तर शेवटी आभार संतोष घाटुळे यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी अनिल शिंपले,अक्षय भंडारे, सतिश वैद्य, महादेव हाजगुडे, यांच्यासह आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# बीटस्तरीय 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' आढावा बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मुख्यमंञी माझी शाळा सुंदर शाळा, बालविवाह प्रतिबंधक कायद्या व उपक्रम, नवभारत साक्षरता मिशन, मतदार जनजागृती, शैक्षणिक उपक्रमात सहभाग,परीक्षा पे चर्चा व शैक्षणिक गुणवत्ता याबाबत जायकवाडी पैठण बीट स्तरावर आढावा बैठक सोमवारी संपन्न झाली. महाराष्ट्र शासनाचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प मुख्यमंञी माझी शाळा,सुंदर शाळा अभियान बाबत रविंद्र वाणी साहेब, सहायक शिक्षण संचालक, छञपती संभाजीनगर यानी सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शन केले. प्रकाश लोखंडे, शिक्षण विस्तार अधिकारी,पंचायत समिती, पैठण यांनी प्रास्ताविकात या आभियानाची माहिती दिली. याप्रसंगी मुश्ताक शेख शिक्षण विस्तार अधिकारी यानी परिपञकानसार मुद्दे निहाय मार्गदर्शन केले. या प्रसंगी केंद्रप्रमुख श्री.उत्तम खरातसर, दिलीप थोटे सर, मंगला मदने मॅडम, संतोष पवार सर, राम तांगडे सर, पांडुरंग नाचण सर, ज्ञानेश्वर वाडेकर सर,दराडे सर,खेडकर सर,किशोर झोटे, सचिन सेवणकर सर,अंकुश गाढे सर,सुनील झारगड सर,जोशी मॅडम, बनसोडे सर,एकनाथ नरके सर व मुख्याध्यापक उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पत्रकार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना पत्रकारितेविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जयहिंद कॉलेज,धुळे येथे आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण दिनानिमित्त तसेच राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त झेप मराठीचे प्रमुख संपादक प्रा.अनिल चव्हाण सर आणि दै.दिव्य मराठी, धुळे विभाग संपादक मा.श्री. अमोल पाटील सर यांचे पत्रकारिता भविष्यातील आव्हाने व सामाजिक बांधिलकी या विषयावर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. सर्वप्रथम प्रा.मोहन मोरे सरांनी व विद्यार्थ्यांनी प्रास्ताविकात आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याची माहिती सादर केली. तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचा कार्य परिचय करून दिला.

याप्रसंगी जेष्ठ पत्रकार मित्र दै.दिव्य मराठी चे संपादक श्री.अमोल पाटील सर ,झेप मराठीचे प्रमुख संपादक प्रा.अनिल चव्हाण सर, डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम चे मार्गदर्शक प्रा. मोहन मोरे सर यांचे पत्रकार दिनानिमित्त पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

भावी पत्रकारांना मार्गदर्शन करताना अमोल पाटील म्हणाले की पत्रकारिता क्षेत्रात दिवसेंदिवस बदल होत आहेत त्यामुळे पत्रकारांनी नेहमी अपडेट राहणं गरजेचे आहे. पत्रकारिता हे व्यक्तिमत्त्व विकासाचे एक साधन आहे.पत्रकार हा संपूर्ण समाजाच्या सुख दुःखाशी जोडला जातो.बातमी देताना खरे खोटेपणा पडताळून पाहिला पाहिजे.समाजाचा विश्वास हीच पत्रकाराची सर्वात मोठी ताकद असते.आदर्श पत्रकाराचे लेखन,संभाषण आणि प्रबोधन हे तीन



गुण महत्वाचे असतात ज्यावर त्याचे श्रेष्ठत्व सिद्ध होते! त्यानंतर झेप मराठीचे प्रमुख संपादक प्रा. अनिल चव्हाण सर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की काळ आणि समाज बदलतो आहे त्यामुळे आजच्या परिस्थितीत पत्रकारांसमोर अनेक आव्हाने आ वासून उभे आहेत.पत्रकारांवर होणारे हल्ले पत्रकारितेला खूप घातक आहेत.घटनेच्या खोलात जाऊन दोन्ही बाजूने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पत्रकारिता करणे गरजेचे आहे.पत्रकाराने सामाजिक बांधिलकी जपत समाजाच्या वेदना वृत्तपत्रात मांडल्या पाहिजेत.पत्रकारांनी समाजाशी समरस होऊन त्यांच्या सुख दुःखात सहभागी झाले पाहिजे. एक आदर्श पत्रकार हा माणसं जोडतो आणि समाजाला योग्य दिशेने पुढे नेतो! तसेच या प्रसंगी डिप्लोमा इन कम्युनिकेशन अँड जर्नालिझम च्या भावी पत्रकार विद्यार्थ्यांचा देखील मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी पत्रकारिता क्षेत्राशी संबंधीत समस्या व प्रश्न मान्यवरांना विचारून आपल्या शंकाचे निराकरण केले.

शेवटी विद्यार्थ्यांनी बहुमोल अशा मार्गदर्शनाबद्दल उपस्थित मार्गदर्शक मान्यवरांचे आभार मानले.

# छायाचित्रकाराला पोलिसांची मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : हुडकेश्वर पोलीस ठाण्याचा कारभार नेहमी चर्चेत असतो. तीन पोलीस कर्मचाऱ्यांनी एका छायाचित्रकाराला पोलीस ठाण्यात आणून बेदम मारहाण केली. वाहन चोरीच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देऊन त्याच्याकडून ६० हजार रुपये उकळले आणि सोडून दिल्याची घटना उजेडात आली. वाठोड्यातील अनमोलनगरात राहणारा निलेश हा छायाचित्रकार म्हणून व्यवसाय करतो. त्याच्या घरी संदीप (सिवनी-मध्यप्रदेश) नावाचा युवक पाच वर्षांपूर्वी भाड्याने राहत होता. तो ६ डिसेंबरला नागपुरात आणि निलेशच्या घरी गेला. त्याने गावी जात असल्याचे सांगून दुचाकी घरात ठेवू देण्याची विनंती केली. संदीप ओळखीचा असल्यामुळे त्याने दुचाकी ठेवण्यास परवानगी दिली. ११ डिसेंबरला हुडकेश्वर पोलिसांनी संदीपला अटक केली.

# निफाड बसस्थानकात शौचालयात शुल्क आकारणी

## आधुनिक केसरीच्या बातमीची दखल घेत छावा मराठा सेनाही करणार धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** बसस्थानकात शौचालयात शुल्क आकारणी प्रकरणी दै.आधुनिक केसरीत वृत्त प्रकाशित झाले होते. त्याची दखल घेऊन छावा मराठा सेनेने आज निफाड आगारात निवेदन देऊन पैसे घेणे बंद करावे अन्यथा धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे. तालुक्यातील महत्वाच्या निफाड बसस्थानक स्वच्छतागृहात महिलांना सुट्टे पाच रुपये द्यावे लागतात, त्यामुळे महिलांची कुचंबना होत आहे. याबाबत ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती जिल्हाभर आंदोलन छेडणार असल्याची माहिती मुकुंद आव्हाड यांनी दिली याबाबत दै.आधुनिक केसरीत वृत्त प्रकाशित झाल्यानंतर दि.८ जानेवारी रोजी छावा मराठा सेना महाराष्ट्र राज्य संघटनेचे नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्ष पोपट भाऊ पा पताडे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड बस स्थानक प्रमुखांना निवेदन देण्यात आले. एकीकडे महामंडळ महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देते तर दुसरीकडे मात्र शौचलयाचे पैसे वसूल करते तरी निफाड बस स्थानक प्रमुखांनी सदर शौचालय चालकांवर कारवाई करून मोफत शौचालय असे फलक लावण्यात यावे असे आदेश करावे, अन्यथा छावा मराठा सेना महाराष्ट्र राज्य संघटनेचे नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड बस स्थानकात



एकदिवसीय धरणे आंदोलन करून जागो ग्राहक जागो जनजागृती करण्यात येईल असा इशारा दिला आहे. निवेदन देण्यासाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद धुमाळ, तालुका उपाध्यक्ष शुभम सुरलकर, तालुका कार्याध्यक्ष संभाजी लोणारे, संघटक दर्शन वाघे आदी उपस्थित होते.

# स्व. नरसिंगराव बोडखे विद्यालयात गायत्री गायकवाडचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** इथून जवळच असलेल्या थोडप बु. येथील स्व. नरसिंगराव बोडखे विद्यालयात कु.गायत्री संतोषराव गायकवाड हिचा मुंबई येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवायोजनेतून पथसंचालनामध्ये तिची निवड झाल्याने शाळेच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक सज्जनराव बाजड प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य दिगंबररावजी मवाळ, प्राचार्य विनोद पाटील नरवाडे संस्थेचे सचिव संतोषराव गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून संस्थेचे सचिव संतोषराव गायकवाड यांनी आज स्पर्धेच्या युगात प्रत्येक जण मेडिकल व इंजीनियरिंग च्या मागे लागलेला आहे पण मुलांना काय आवडते तेओळखून त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे निश्चितच विद्यार्थी दैदीप्यमान यश प्राप्त करू शकतात असा मोलाचा सल्ला




त्यांनी यावेळी सांगितला.प्राचार्य मवाळ सर यांनी आपल्या मनोगत आतून महागाव सारख्या छोट्याशा खेड्यांतील मुलीने हे दैदीप्यमान यश प्राप्त केले हे तुम्हा आम्हा सर्वांसाठी प्रेरणा देणारे आहे असे गौरवोद्गार काढले. प्राचार्य विनोद पाटील नरवाडे यांनी तिच्या अंगी जिद्द मेहनत चिकाटी ह्या गोष्टी असल्यामुळेच तिला हे यश मिळू शकले म्हणून विद्यार्थ्यांनी सुद्धा तिच्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे असे मत व्यक्त केले. आपल्या अध्यक्ष भाषणातून मुख्याध्यापक सज्जनराव बाजड यांनी गायत्रीचा बालपणापासून तू आतापर्यंत सर्व शैक्षणिक प्रवास आपल्या मनोगतातून व्यक्त केला. सत्काराला उत्तर देताना कु.गायत्रीने माझ्यावर माझ्या कुटुंबाचे माझ्या गुरुजनांचे व आपल्यासारख्या ज्येष्ठ मंडळीचे आशीर्वाद माझ्या सदैव पाठीशी असल्याने मी हे यश संपादन करू शकले असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सुद्धा आपण ग्रामीण भागातले आहोत म्हणून स्वतःला कमी न लेखता आपल्यामध्ये सुद्धा क्षमता असतात त्या ओळखून त्याप्रमाणे मार्गदर्शन करा तुम्हाला सुद्धा यश मिळते असा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप भिसडे यांनी केले व आभार प्रदर्शन विजय आढाव यांनी केले. कार्यक्रमासाठी शाळेतील बहुसंख्य विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली होती.

# सावंगी -सुलतानपूर रस्ता, धोकादायक पुलाचे काम करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी ते सुलतानपूर पर्यंत रस्ता दुरुस्ती तथा माटरगाव गिरिजा नदीवरील जिर्ण व धोकादायक पुलाचे काम करण्याची मागणी प्रवासी नागरिक व वहानधारक करत आहे.

वर्ष -२०२२ दरम्यान पर्यंत मुख्यमंत्री सडक योजना अंतर्गत बाजार सावंगी ते सुलतानपूर पर्यंत रस्ता करण्यात आला होता.व दुरुस्ती कामाची हमी होती.ती २०२२मधेच संपली आहे.वर्ष २०१८मधे या रस्त्याचे काम करण्यात आले होते व पाच वर्ष दुरुस्ती हमी संपल्यानंतर गत एका वर्षांपासून रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डेच खड्डे पडले आहे.तर माटरगाव येथील गिरीजा नदीवरील पुल अतिशय ना दुरुस्त जिर्ण पडण्याच्या मार्गावर असुण वेळोवेळी मागणी करुन ही वरिष्ठ याकडे लक्ष देण्यास तयार नाही सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता वर्ग करुन घेवून रस्ता व पुल काम हाती घ्यावे असी मागणी प्रवासी नागरिक तथा वहानधारक नागरिकांतून होत आहे.

# मनपा शाळांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

## शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व शाळा दिनदर्शिका २०२४ चा प्रकाशन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिका पीएम श्री सावित्रीबाई फुले सेमी इंग्रजी शाळा येथे ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व शाळा दिनदर्शिका प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक जिल्हाधिकारी मा.मुरूगानंथम एम,मनपा उपायुक्त मंगेश खवले,मुख्यलेखाधिकारी मनोहर,बागडे,उपशिक्षणाधिकारी (माध्य.) निकिता ठाकरे,पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी निवास कांबळे, शिक्षण विस्तार अधिकारी धनराज आवारी,मनपा शिक्षणाधिकारी नागेश नित तसेच शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत शाळेच्या लेझिम पथकाद्वारे करण्यात आले. यावेळी शाळेचे स्नेहसंमेलन कार्यक्रम सुद्धा आयोजीत करण्यात येऊन विद्यार्थी व पालकांच्या वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी, निबंध, वेशभूषा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. पालकांच्या स्पर्धेत विजयी महिला पालकांना मा.सहाय्यक जिल्हाधिकारी यांच्या हस्ते बक्षिस देऊन महिला पालकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन सुद्धा करण्यात आले. विद्यार्थ्यांनी केलेले काही सादरीकरण पाहून मा.सहाय्यक जिल्हाधिकारी व उपायुक्त यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी नर्सरी ते वर्ग दहावी च्या विद्यार्थ्यांनी विविध नाटिका, समूह नृत्य इत्यादींचे उत्तम सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच पालकांचा सहभाग लाभला.



# एसईएच्या अभियंता दैनंदिनीचे थाटात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सबॉर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनच्या (एसईए) अभियंता दैनंदिनीचे प्रकाशन रविवारी (७ जानेवारी) महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात व दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. अभियंता दैनंदिनीचे हे ४७ वे वर्ष असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला हा पहिल्यांदाच हा बहुमान प्राप्त झाला.

एसईए पतसंस्थेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महापारेषणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता अविनाश निंबाळकर तर अध्यक्षस्थानी सबॉर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनचे अध्यक्ष केदार रेळेकर होते. एसईएचे सरचिटणीस संतोष खुमकर, संघटन सचिव नागनाथ गयाळे, उपाध्यक्ष राजाराम शितोळे, प्रादेशिक सचिव अविनाश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी डॉ.केळे यांनी उत्कृष्ट दैनंदिनी बनवल्याबद्दल एसईएचे कौतुक केले. एसईएची दैनंदिनी हा एक महत्वाचा दस्तऐवज असून महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्ही कंपन्यांतील अभियंत्यांना अतिशय उपयोगी ठरणारा मजकूर या दैनंदिनीत आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छत्रपती संभाजीनगरचे सहसचिव राजेंद्र राठोड, दैनंदिनीचे संपादक रवी मिरगणे, महिला प्रतिनिधी सुप्रिया कुलकर्णी, प्रशांत बनसोडे, गणेश राठोड, विनोद शेवनकर, विजय काथार, विठ्ठल सपकाळ, अविनाश जोशी, प्रजीतकुमार नाईकवाडे, समीर बोद्रे, गणेश सोनवणे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीष अंभोरे यांनी केले.

# उंबरठाण ग्रामीण रुग्णालयाला राज्य सरकारची मंजुरी : आ. पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये मंत्रालयात झालेल्या आरोग्य विभागाच्या बैठकीत दिल्यानंतर राज्य सरकारच्या आरोग्य यंत्रणेने तातडीने पावले उचलली आहे. आरोग्य विभागाने उंबरठाण ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी दिली असल्याची माहिती कळवण सुरगाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार नितीन पवार यांनी दिली. सुरगाणा तालुक्यातील बालमृत्यु व कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यासाठी चांगली आरोग्य सुविधा येथील नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, उंबरठाण येथे ३० खाटांचे ग्रामिण रुग्णालय सुरु केल्यास कुपोषणाचे व बालमृत्युचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असल्याचे आमदार नितीन पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या बैठकीत निदर्शनास आणून देत सुरगाणा तालुक्यातील आरोग्य विभागाच्या अडचणी आणि समस्याचा पाढा वाचून लक्ष वेधले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आरोग्य विभागाच्या बैठकीत उंबरठाण प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याचे निर्देश दिले होते. त्यांची अंमलबजावणी



आरोग्य विभागाकडून करण्यात आली असून राज्य सरकारने परिपत्रकांद्वारे ग्रामीण रुग्णालयास मंजुरी दिली आहे. सुरगाणा तालुका पूर्णपणे आदिवासी व अतिदुर्गम तालुका असल्याने येथील गोर-गरीब रुग्णांना वैद्यकिय उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी व वेळप्रसंगी जिल्ह्याच्या ठिकाणी उपचार घेण्यासाठी जावे लागत असल्यामुळे वेळ व आर्थिक नुकसान होत असल्यामुळे उंबरठाण परिसरातील आरोग्य सेवेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्यात आल्यामुळे या भागातील आरोग्य प्रश्न मार्गी लागणार असल्याचे आमदार नितीन पवार यांनी सांगितले.

# घे पंगा खेळाचा कर दंगा विजयाचा..

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय जनता पार्टी वैजापूर गंगापूर तसेच युवा मोर्चा यांच्या मार्फत नमो चषक 2024 चे आयोजन करण्यात आले असून यात भव्य अश्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डॉ. दिनेश परदेशीं व प्रदेश कार्यकारणी सदस्य एकनाथ जाधव यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन केले आहे.

क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा कालावधी 12 जानेवारी ते 26 जानेवारी असणार असून 27 जानेवारी ला अंतिम बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.





# दर्पणदिनी बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन व पत्रकारांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील नगरपालिकेच्या वैजीनाथ सार्वजनिक वाचनालयात शनिवार( ता.०६ )रोजी वाचक वर्ग व पत्रकारांनी एकत्र येत दर्पणकार बाळ शास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करीत दर्पण दिन साजरा केला,नगरपालिका वाचनालय प्रशासन च्या वतीने पर्यवेक्षक एम,आर, गणवीर, सहायक गुलाब गायकवाड, संजय राजपूत यांनी या दर्पण दिन निमित्त सर्व पत्रकारांना गुलाब पुष्प देऊन त्यांचा सन्मान केला ,या प्रसंगी जेष्ठ पत्रकार भानुदास धामणे, सुनील त्रिभुवन,समीर लोंढे,धोंडीरामसिंह राजपूत,मकरंद कुलकर्णी,किरणसिंह राजपूत, अशोकबोराडे, कमलाकर रासने,दीपक बरकसे, विलास म्हस्के, अजय राजपूत,गोरख पवार, इकबालसिंह पंजाबी,इत्यादी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक



शाळेत स्त्री शिक्षणाचे दरवाजे खऱ्या अर्थाने स्त्रियांसाठी ज्यांनी खरी उघडली त्या सावित्रीबाई फुले या कार्यामध्ये नेहमीच त्यांच्या खांद्याला खांदा देऊन काम करणाऱ्या फातिमा शेख. आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोलखेडा येथे त्यांच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केंद्र प्रमुख एस.बी.राठोड मॅडम,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजू वारागंणे, उपाध्यक्ष पकंज वाघ व मुख्याध्यापक सुभाष अवधूत आणि शिक्षक पालक वर्ग विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आले.आणि अभिवादन केले. यावेळी स्त्रियांसाठी साक्षरतेची वाट प्रकाशमान करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या वर जीवनकार्यावर मान्यवरांनी प्रकाशला.शाळेतील सावित्रीच्या लेकींनी सावित्रीबाई फुले यांची धनश्री अमोल बोंडे, स्वप्नांजा अनंत जोशी यांनी वेशभूषा परिधान करून आपले मनोगत व्यक्त केले. सातारा जिल्ह्यातील नायगाव या ठिकाणी सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. ज्योतिबा फुले यांच्याशी त्यांचा विवाह झाल्यानंतर ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणाची गोडी निर्माण करून शिक्षण दिले. त्याच शिक्षणाच्या जोरावर ती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचे दरवाजे खुले केले. त्याच जोरावर खऱ्या अर्थाने आज सावित्रीची लेक शिकून मोठ्या पदावर ती बसू लागली आहे अशा भावना विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या.या कार्यक्रमाची प्रस्तावना संदीप कळसकर व भूषण चौधरी यांनी केली तर आभार दयानंद बाजुळंगे यांनी मानले. याप्रसंगी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे,शाळेये समितीचे अध्यक्ष राजूभाऊ वारागंणे, उपाध्यक्ष पकंज वाघ, मुख्याध्यापक सुभाष अवधूत, संदीप कळसकर,आनंदा वारांगणे कवी, भूषण चौधरी, दयानंद बाजुळंगे, ग्रामपंचायत सदस्य,विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धासाठी संकेत किरगतची गुजरात संघात निवड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** हरियाणा राज्यातील



गुहाना येथे दी 4 जानेवारी ते 6 जानेवारी दरम्यान होनाऱ्या राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धासाठी वेरुळ येथील संकेत वैभव किरगतची गुजरात राज्याचा जूनियर संघात निवड झाली असून त्याने अहमदाबाद येथे झालेल्या सराव शिबिरात आपला सहभाग नोंदविला होता यानंतर गुजरात संघ बुधवारी अहमदाबाद येथून गुहानाला



रवाना झाला संकेत किरगत याने या आधी महाराष्ट्रच्या संघात खेळाडू सह कर्णधार पद भूषवित दमदार कामगिरी करीत अनेक पदके महाराष्ट्रसह जिल्हा संघास मिळवून दिली होती याची दखल घेत गुजरात डॉजबॉल असोसीयशनने संकेत किरगत याला आपल्या राज्याच्या संघात सहभागी करुन घेतले असून संकेत किरगत सध्या एडव्होकेट बी डी हंबरडे कॉलेज आष्टी ( बीड ) येथे शिक्षण घेत असून त्याचा या निवड़ी बद्धल स्वराज्य संकल्पक शहाज़ी राजे भोसले जयंती समिती अध्यक्ष राजेंद्रजी पवार , गुजरात सचिव पलक सौंदरवा , प्रशिक्षक गौरव सिंह , हरविंदर सिंह , संस्था अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे , प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे , क्रीडा शिक्षक डॉ संतोष वनगुजरे , किरण निकाळजे , बालाजी नागरगोजे , अनिकेत निकाळजे, तालुका क्रीड़ा संयोजक आशीष कान्हेंड, मोहम्मद अख्तर कुरैशी, श्रीकांत शिंदे, मोहम्मद रियाजोद्धिन, नीलेश ढीवरे, सुशील शिरसाठ, निखील कुशेर , मनोहर गावड़े, गणपत म्हस्के यांनी अभिनंदन केले.



# अशोक गायकवाड यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाचे खुलताबाद गंगापूर विधानसभा अध्यक्षपदी अशोक गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन व सत्कार करण्यात आला. खुलताबाद येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश सावजी युवक जिल्हा उपाध्यक्ष अरुण तंबारे, माजी नगरसेवक इसाक कुरेशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी भाऊसाहेब जाधव, कल्याण पाटील पुनम चव्हाण, प्रभाकर चव्हाण, प्रभाकर चव्हाण आधी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. यावेळी अशोक गायकवाड यांनी बूथ कमिटी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका यांची माहिती घेतली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर